**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राजमोहंम्मद हबीबुद्दीन शेख,<br>जिल्हा परिषद क्वॉर्टर, घर नं. बी. १३, घाटी दवाखाना गेट समोर, पानचक्की रोड, ज्युब्ली पार्क, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>चेअरमन, औरंगाबाद जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०४५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक, औरंगाबाद जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था, औरंगाबाद - श्री. के. बी. देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद<br>- श्री. डी. एम. पालोदकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०१-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३-०२-२०११

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०६-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक २२-०२-२०१२ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यावेळी प्रकरणात जन अपिलीय अधिकारी यांची साक्ष आयोगास आवश्यक वाटत असल्याने सदर सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २९-११-२०१० च्या माहिती अर्जान्वये चेअरमन, औरंगाबाद जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था, औरंगाबाद यांच्याकडे माहितीचा अर्ज केलेला आहे. पतसंस्थेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान प्राप्त होत नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम कायदा सदर संस्थेस लागू होत नाही. यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेले खालील निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

१. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्रमांक १३०४/२००८, जळगांव जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोशिएशन लि. विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये मा. न्यायालयाने दिनांक १७-०२-२००९ रोजीचे आदेशान्वये सहकारी संस्था, नागरी बँका व पतसंस्था संदर्भात संस्थेचे ताळेबंद पत्रक व नफातोटा पत्रक या व्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सर्वसामान्य जनता आणि/किंवा सभासद यांना उघड करुन देण्यास प्रतिबंधीत केलेले आहे.

२. मा. राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर/अमरावती विभाग यांचे दिनांक १८-०१-२००७ रोजीचे आदेशाविरुध्द चेअरमन, बालाजी सहकारी सूत गिरणी म. रिसोड, जिल्हा वाशिम यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्रमांक ३६४८/२००७ दाखल केली होती, त्यामध्ये मा. न्यायालयाने दिनांक ०२-०३-२००९ रोजी निर्णय दिलेला आहे. त्याचप्रमाणे रिट याचिका क्रमांक ५६६६/२००७, डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक अमरावती विरुध्द राज्य माहिती आयुक्त, विदर्भ विभाग, नागपूर व इतर मध्ये दिनांक १३-०१-२००९ रोजी निर्णय दिलेला आहे. सदर दोनही निर्णयामध्ये मा. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम, १९६० अंतर्गत नोंदविण्यात आलेली संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (एच) मधील सार्वजनिक प्राधिकरण या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची

असल्याचे स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम लागू नसल्याबाबत निर्णय दिला आहे.

३. मा. केंद्रीय माहिती आयोग, नवी दिल्ली यांचेकडे नवजागृती को-ऑपरेटिव्ह ग्रुप हौसिंग सोसायटी, दिल्ली संदर्भात एकूण (९) मुद्दयांची माहिती मिळणेबाबत श्री. पी. सी. जातव, फलॅट नं. ३०, नवजागृती अपार्टमेंट, प्लॉट नं. ११, वसुंदरा इन्क्लेव्ह, दिल्ली यांनी दिनांक २५-०३-२००९ रोजी व्दितीय अपील क्रमांक सीआयसी/एसजी/अे/२००९/०००५७४ दाखल केले होते. सदर अपिलावर मा. केंद्रीय माहिती आयोगाने दिनांक १५-०५-२००९ रोजी निर्णय दिला आहे. सदर निर्णयामध्ये त्यांनी स्पष्ट केले आहे की, माहिती आयोगाला अपिलार्थी यांचे अडचणीबाबत सहानुभूती आहे, परंतु आयोगाचे कामकाज हे माहिती अधिकार अधिनियमाचे कायद्याअंतर्गत चालते व प्रतिवादी को-ऑपरेटिव्ह सोसायटी ही सदर कायद्यानुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या (पब्लीक ॲथॉरिटी) व्याख्येत येत नाही. त्यामुळे आयोग प्रतिवादी संस्थेच्या व्यवस्थापकास अपिलार्थीस माहिती देणेसंदर्भात आदेशित करु शकत नाही, असे नमूद करुन मा. केंद्रीय माहिती आयोगाने अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील दिनांक १५-०५-२००९ रोजीचे निर्णयान्वये फेटाळले आहे.

४. श्री. राजेंद्र लक्ष्मण म्हेत्रे, मु. पो. विटा, मुंढे मळा, तालुका खानापूर, जिल्हा सांगली यांनी जन माहिती अधिकारी, दि विटा मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक लि. विटा, जिल्हा सांगली यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार अर्ज सादर करुन माहितीची मागणी केली होती तथापि बँकेने माहितीचा अधिकार लागू नसल्याचे कारण नमूद करुन माहिती देण्यास नकार दिला. सदर प्रकरणात माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थी यांनी मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे व्दितीय अपील क्रमांक २००६/२२५/०२ दाखल केले होते. सदर अपिलाची दिनांक ०५-०७-२००६ रोजी सुनावणी घेण्यात येऊन मा. मख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांनी आदेश पारीत केले. ज्यामध्ये स्पष्ट केले आहे की, मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाने दिनांक ०८-०२-२००६ रोजी स्पष्टीकरणात्मक आदेश निर्गमीत केले आहेत. ज्यानुसार नागरी सहकारी बँकाना शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरितीने देण्यात येत नसल्याने तसेच त्यांनी इतर वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या अर्थसहाय्यास शासकीय हमीच्या स्वरुपात सहाय्य करण्यात येत नसल्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी लागू नसल्याबाबतचे स्पष्टीकरण केलेले आहे. तसेच मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे सदर स्पष्टीकरणात्मक आदेशाशी शासन पूर्णपणे सहमत आहे व आयोग राज्य शासनाचे भूमिकेशी सहमत आहे, असे मत नोंदवून मा. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी श्री. राजेंद्र लक्ष्मण म्हेत्रे यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अमान्य केलेबाबतचा आदेश दिलेला आहे.

आयोगासमोर केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती संस्थेस माहिती अधिकार अधिनियम लागू होत नसल्याने त्यांना देय होत नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. अत: जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय रद्द करण्यात

येत आहे. अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती संस्थेचे सभासद या नात्याने संस्थेकडून त्या नियमांनुसार घेऊ शकतात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजमोहंम्मद हबीबुद्दीन शेख, जिल्हा परिषद क्वॉर्टर, घर नं. बी. १३, घाटी दवाखाना गेट समोर, पानचक्की रोड, ज्युब्ली पार्क, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, औरंगाबाद जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बिहारीलाल चंदुलाल परदेशी, : अपिलार्थी
राजमहल टॉकीज जवळ, रंगार गल्ली, काद्राबाद, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (स्वासैकक्ष),
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप सचिव (स्वासैकक्ष), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७१६

२ सुनावणीची तारीख दि. ०३-०४-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (स्वातंत्र्य सैनिक कक्ष), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
- श्री. ज्ञानदेव लक्ष्मण सूळ

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, (स्वातंत्र्य सैनिक कक्ष), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०८-१०-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. ०३-११-२००९

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. १७-१२-२००९

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २२-०१-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २४-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०२-०४-२०१२ च्या पत्रान्वये विधीमंडळाचे कामकाज असल्यामुळे उपस्थित राहू शकत नाही असे आयोगास कळविले आहे.

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २७-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बिहारीलाल चंदुलाल परदेशी, राजमहल टॉकीज जवळ, रंगार गल्ली, काद्राबाद, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (स्वातंत्र्य सैनिक कक्ष), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, (स्वातंत्र्य सैनिक

कक्ष), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चौधरी मारुतीराव विष्णुपंत, : अपिलार्थी
प्लॉट नं. ३४-३५ ब, जयनगर, जुना रेवगांव रोड, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी,
ग्रामीण उपविभाग, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी,
विभाग क्रमांक १, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७१७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी,<br>ग्रामीण उपविभाग, जालना | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी,<br>विभाग क्रमांक १, जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०३-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, विभाग क्रमांक १, जालना यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, विभाग क्रमांक १, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चौधरी मारुतीराव विष्णुपंत, प्लॉट नं. ३४-३५ ब, जयनगर, जुना रेवगांव रोड, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, ग्रामीण उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, विभाग क्रमांक १, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रकांत बी. के., : अपिलार्थी
रा. अण्णाभाऊ साठे नगर, अंबड, तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, अंबड,
तालुका अंबड, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, अंबड,
तालुका अंबड, जिल्हा जालना

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७१८

२ सुनावणीची तारीख दि. ०३-०४-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, अंबड,
तालुका अंबड, जिल्हा जालना - श्री. डी. एस. बरधे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, अंबड,
तालुका अंबड, जिल्हा जालना - श्री. आर. एम. दिंडे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. १३-०७-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-११-२००९

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०१-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे व त्यांची पोच त्यांच्या दप्तर दाखल आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन ही बाब दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १०-०६-२०१० च्या पत्रान्वये तालुका कृषि अधिकारी, अंबड, जिल्हा जालना यांना पोच दिली आहे की, त्यांनी दिनांक १३-०७-२००९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या संपूर्ण माहितीचे अवलोकन केले आहे व त्यांचे समाधान झाले असल्याने त्यांची कोणतीही तक्रार नाही अपिलार्थीस माहिती मिळाली आहे ही बाब विचारात घेता प्रकरण निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत बी. के., रा. अण्णाभाऊ साठे नगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुखदेव नामदेव सावंत, : अपिलार्थी
मु. निंबोळा, पो. सिपोरा (बा.), तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, कृषि कार्यालय, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, कृषि कार्यालय, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७१९

२ सुनावणीची तारीख दि. ०३-०४-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. सुखदेव नामदेव सावंत : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी,
भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना
- श्री. बाबुसिंग दलसिंग राठोड

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना - श्री. माधव सुभाषराव बोईनवाड

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०८-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी दिनांक २६-०८-२००९ च्या माहिती अर्जान्वये सन २००७-०८ व २००८-०९ या कालावधीत भोकरदन तालुक्यात विविध विकास कामावर झालेल्या खर्चाबाबत तालुका कृषि अधिकारी, भोकरदन यांच्याकडे माहिती मागितली आहे तथापि ही माहिती त्यांना अद्यापपावेतो मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थीस दिनांक ०५-०३-२०१० रोजी संपूर्ण माहिती दिलेली आहे व अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाल्याबाबत पोच दिली आहे. आयोगाने सूचित केल्याप्रमाणे ती पोच अपिलार्थीस दाखविण्यात आली.

आज रोजी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा एक संच जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे तो आयोगाने सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीस देण्यात आला व अपिलार्थीने तो स्विकारला.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुखदेव नामदेव सावंत, मु. निंबोळा, पो. सिपोरा (बा.), तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. तावरे हरिभाऊ माधवराव,<br>मु. पो. चिकनगांव, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड क्रमांक २, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. एम. पवार, उप कार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना अर्धवट माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१ सप्टेबर २००९ ते ३० ऑक्टोबर २००९ या कालावधीत झालेल्या जालना अंबड ते वडीगोद्री या रस्त्याचे डांबरीकरण, तसेच खड्डा भरणे इत्यादी कामाच्या अंदाजपत्रकाच्या प्रती आणि डांबर किती खर्च झाले इत्यादी माहिती मागितली आहे.

अपिलार्थीने त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांना देय होत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड तालुका अंबड, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तावरे हरिभाऊ माधवराव, मु. पो. चिकनगांव, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख खाजा शेख अमीर,<br>नरिमन नगर, रेल्वेस्टेशन जवळ, जुना जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रथम लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना - श्री. एच. जी. कंडाळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना - श्री. एस. एम. पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालील दोन मुद्दयांवर माहिती मागितल्याचे दिसून येत आहे.

१. आपल्या विभाग क्रमांक २ अंतर्गत येणारे सर्व उपविभाग यांच्या कार्यालयातील उप अभियंता अंतर्गत येणारे सर्व सी. आर. व एस. आर. कामाच्या ज्या निविदा वृत्तपत्रात प्रसिध्दीस दिल्या त्या वृत्तपत्राचे नाव, एजन्सीचे नांव, काम व प्रसिध्दी निविदाची साक्षांकीत सत्यप्रत.

२. कार्यकारी अभियंता श्री. चाटेसाहेब यांनी सी. आर. व एस. आर. कामाच्या निविदा ज्या वृत्तपत्रात प्रसिध्दीस दिले त्या वृत्तपत्राची प्रत सत्यप्रत, एजन्सीला दिलेले काम, एजन्सीचे नांव.

माहितीचा कालावधी सन २००८ ते ऑक्टोबर २०१० असा आहे.

अपिलार्थी यांना २२-०३-२०१२ रोजी म्हणजे व्दितीय अपील केल्यानंतर माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. ही बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या माहिती अर्जाचा निपटारा कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत होईल यासाठी दक्ष राहावे, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख खाजा शेख अमीर, नरिमन नगर, रेल्वेस्टेशन जवळ, जुना जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्रकुमार किशनलाल जायस्वाल, : अपिलार्थी
मु. पो. बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, तलाठी सज्जा, बदनापूर, तालुका बदनापूर,
जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर,
तालुका बदनापूर, जिल्हा जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७२२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, तलाठी सज्जा, बदनापूर, तालुका बदनापूर,<br>जिल्हा जालना - श्री. एम. डी. धन्ने | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर,<br>तालुका बदनापूर, जिल्हा जालना - श्रीमती वांगीकर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०४-०१-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २३-०६-२००९ च्या माहिती अर्जान्वये खालील माहिती मागितली आहे.

१. मौजे बदनापूर येथील गट नंबर २५५ मधील ३० X ८० चा जो फेरफार करण्यात आलेला आहे, ज्याचा फेरफार क्रमांक २५२० आहे. सदर फेरफार मंजूर करताना तलाठी, बदनापूर यांचेकडे बाबासाहेब अर्जुन खैरे यांनी दाखल केलेल्या वाटणीपत्राची नक्कल.

२. अकृषिक क्रमांक २००३/जेएमबी/एन.ए./डब्ल्यू.एस-१०, तहसील ऑफिस बदनापूर दिनांक ०३-०१-२००३, गट नंबर २५५ बाबत दिलेल्या परवानगीची संचिकेची नक्कल (पूर्ण संचिका).

अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर यांनी दिनांक ३१-१२-२००९ रोजी निर्णय दिला आहे की, श्री. यु. एन. भोसले तत्कालीन तलाठी सजा बदनापूर यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी सदरील वाटणीपत्राची नक्कल अर्जदारास देऊन तात्काळ अर्जदारास माहिती द्यावी व अर्ज निकाली काढावा.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन सद्यस्थिती आयोगास दिसून येत नाही. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर, जिल्हा जालना यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. पुर्वीचे जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली आहे तथापि आयोगास या प्रकरणात प्रथम अपिलावर पुन्हा सुनावणी घेणे आवश्यक वाटते. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रकरणात अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे याबाबत शहानिशा करुन तसेच दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन आपले आदेश पारित करावे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्रकुमार किशनलाल जायस्वाल, मु. पो. बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी सज्जा, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. फारुख शेख मियाँ कुरेशी, (पत्रकार),<br>मु. पो. जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, जाफ्राबाद,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, जाफ्राबाद,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना - श्री. एन. एम. देशपांडे | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. पी. के. ठाकूर | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. टी. गव्हाणे, अ. का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-११-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०५-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन व दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. फारुख शेख मियाँ कुरेशी, (पत्रकार), मु. पो. जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. व्यंकटराव मारोतराव देशमुख, : अपिलार्थी
रा. टेंभुर्णी, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद,
जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद,
तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७२४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना<br>- श्रीमती वंदना शेडोळकर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १०-०२-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपील क्रमांक १७२४/२०१० च्या संदर्भात अपिलार्थीस दिनांक २९-०३-२०१० रोजी कळविण्यात आले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, ती माहिती उप विभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकते. यास्तव अपिलार्थी यांनी माहितीसाठीचा अर्ज उप विभागीय अधिकारी यांच्याकडे करणे उचित ठरत आहे.

वरील बाबी विचारात घेता सदरचे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. व्यंकटराव मारोतराव देशमुख, रा. टेंभुर्णी, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद, तालुका

जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल अजीम पाशुमियाँ, : अपिलार्थी
रा. नाथेकर चौक, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल/पुरवठा), तहसील कार्यालय,
अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबड, तालुका अंबड,
जिल्हा जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७२५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अंबड,<br>तालुका अंबड, जिल्हा जालना - श्री. एम. जी. बरडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबड, तालुका अंबड,<br>जिल्हा जालना - श्री. रुपेश ल. सिंगारे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०३-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४-०२-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०१-२०१० च्या माहिती अर्जान्वये अंत्योदय, अन्न योजनेच्या संदर्भात सन २००९ पासूनची ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतची माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०२-२०१० रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २४-०२-२०१० ला निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती तयार आहे ती फीस भरुन घेऊन जावी. त्यानुसार दिनांक ३०-०३-२०१० रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) यांनी कळविलेले आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी माहिती घेतल्याचे आढळून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध आहे ती अपिलार्थीस विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल अजीम पाशुमियाँ, रा. नाथेकर चौक, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कैलास भिमराव रगडे, : अपिलार्थी
रा.म्हसला, पो. खामगाव,
ता. बदनापुर, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
गट पंचायत समिती, बदनापुर,
ता.बदनापुर, जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर, जि.जालना - श्री. आर.एस.खर्डेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापुर,ता.बदनापुर, जि.जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांचे प्रतिनिधी श्री. एम.के.सापधरे, उप कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, जालना | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१०.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. १४.१०.२००९ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस यापूर्वी दिलेली आहे. तथापि अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे आयोगास दिसून येत नाही. यामुळे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर, जि.जालना यांनी अपिलार्थीच्या दि. १४.१०.२००९ रोजीच्या माहिती अर्जातील माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर, जि.जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कैलास भिमराव रगडे, रा. म्हसला, ता.बदनापूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,बदनापूर,जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र सुखदेव पाटील, : अपिलार्थी
रा.रोहीलागड, ता. अंबड,
जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बदनापुर, जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बदनापुर, जि.जालना - श्री. व्ही.ए.कांबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी,पंचायत समिती, बदनापुर, जि.जालना - श्रीमती वर्षा पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की,अपिलार्थी यांनी दि. ०८.१२.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ श्री.बी.के. तट्टु, ग्रामसेवक यांचा नोकरीत रुजू झाल्यापासून दि. ०८.१२.२००८ पर्यंतचा सेवेसंदर्भातील तपशील मागितला आहे. सदरचे सेवापुस्तक त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, हे त्यांच्या दि.३१.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे कळविण्यात आले आहे. आज रोजी सुध्दा सेवापुस्तिका त्यांच्याकडे नाही. त्रयस्थ श्री. बी.के. तट्टु, ग्रामसेवक हे दि. २२.०९.२००८ पासून इतरत्र कार्यालयात कार्यरत आहेत, असेही त्यांनी कथन केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे. ही बाब विचारात घेता या टप्प्यावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र सुखदेव पाटील, रा. रोहिलागड, ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बदनापुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, बदनापुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रावसाहेब नारायणराव अंभोरे,<br>रा.टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय,टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, जाफ्राबाद, जि.जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रावसाहेब नारायणराव अंभोरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना- श्री. पी.ए.तांबिले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, जि.जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१०<br>(फेरसादर दि. २६.०२.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय,टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी ग्रामपंचायत टेंभुर्णी अंतर्गत शासकीय निधीबाबत सन २००५-०६, २००६-०७, २००७-०८ व २००८ ते ३० नोव्हेंबर २००९ पर्यंत विस्तृत अशी माहिती मागितली आहे. या माहितीमध्ये - आलेला निधी व केलेला खर्च, एम.बी. रेकॉर्ड, काम कोठे झाले, कोणी केले, बील अदा कोणाच्या नावे केली, या संपूर्ण माहितीच्या छायांकित प्रती, सन २००५ ते ३०.११.२००९ या कालावधीतील ग्राम मासिक सभा वृत्तांत व ग्रामसभा वृत्तांताच्या संपूर्ण ठरावाच्या प्रोसिडींगच्या छायांकित प्रती, सन २००५ ते ३०.११.२००९ या कालावधीत ग्राम विकास योजनेअंतर्गत यशवंत योजना, १२ वा वित्त आयोग, स्वर्णजयंती रोजगार योजनेमधून केलेल्या कामाचा जमाखर्च, मोजमाप पुस्तिका, बँक खातेनिहाय माहिती इ.तपशीलवार माहिती - अशी माहिती मागितली आहे. माहितीचे स्वरुप व व्याप्ती फार मोठया प्रमाणात आहे. ती संकलीत करण्यास कालावधी लागला. आता माहिती संकलीत करुन एकूण ३६०० पृष्ठे (दुहेरी ७२००) झालेली आहेत.

आयोगाच्या सूचनेनुसार या माहितीचा संच अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांनी तो स्वीकारला. अपिलार्थी यांनी माहिती मागताना नेमकी व अचूक माहिती मागावी. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जावर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी आता माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये विस्तृत स्वरुपाची अशाप्रकारे माहिती मागितल्यास माहितीच्या संदर्भात कागदपत्रांची पाहणी देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे उचित ठरेल.

या सर्व बाबी विचारात घेता प्रकरण या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रावसाहेब नारायणराव अंभोरे,रा.टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, जाफ्राबाद, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | |
|---|---|
| श्री. राजेंद्र बन्सीलाल पुसे,<br>रा.जालना | : अपिलार्थी |
| **विरुध्द** | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम),<br>जिल्हा परिषद, जालना | : उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना | : |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७२९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना - श्री. व्ही.पी.भारंबे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना - श्री. ए. वाय. गुंजाळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये दि. २९.१२.२००९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मागितली आहे.

"(१) जिल्हा परिषद जालना अंतर्गत सन २००८ ते २००९ या काळात S/R व C/R किती कामे मंजूर झाली. कामाचे नाव व कींमत (२) दि. २३.०२.२००९ रोजी काम वाटप समितीमध्ये किती कामे वाटप करण्यात आली. त्याची यादी (३) ग्राम पंचायत यांना कीती कामे देण्यात आली कामाचे नाव व स्वरुप त्या कामाची वर्क ऑर्डरची झेरॉक्स प्रती (४) टेंडर रजिस्टरची २००८ ते २००९ पर्यंत झेरॉक्स प्रत याची छायांकीत व साक्षांकीत प्रती देण्यात यावी."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थी यांनी दोन वर्षांची माहिती मागितली आहे. ती संकलीत करण्यास कालावधी लागला. तदनंतर माहिती उपलब्ध आहे, असे अपिलार्थीस दि. ०८.०२.२०१० रोजीच्या पत्रद्वारे कळविण्यात आले होते. तदनंतर अपिलार्थी उपस्थित झाले. दि. २३.०८.२०१० रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देण्यात आली. उर्वरित ६१ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहे. ही माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्यात यावी व माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत भविष्यात प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहिती अर्जांवर व प्रथम अपिलांवर विहित मुदतीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी, असे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद, जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र बन्सीलाल पुसे, इंदिरानगर, हनुमान मंदिराजवळ, जुना जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ११-०१-२०१० च्या माहिती अर्जान्वये मौजे पांगरी बु., तालुका मंठा, जिल्हा जालना येथील स्वस्त धान्य दुकानाबाबत सन २००७ ते २०१० या कालावधीची एकूण चार मुद्दयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. ही माहिती विस्तृत स्वरुपाची व मोठ्या कालावधीची असल्याने दुकानदाराकडून एकत्रित करण्यास कालावधी लागला आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मंठा, तालुका मंठा, जिल्हा जालना यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मंठा, तालुका मंठा, जिल्हा जालना यांनी दिनांक १७-०३-२०१० रोजी निर्देश दिलेले आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य अपिलार्थीस देण्यात यावी व मुद्दा क्रमांक ३ व ४ ची माहिती दुकानदाराकडून हस्तगत करुन अपिलार्थीस दिनांक ३०-०३-२०१० पूर्वी विनामूल्य देण्यात यावी. त्याबरहुकूम दिनांक ०६-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांना श्री. ज्ञानेश्वर वायाळ या व्यक्तीमार्फत माहिती देण्यात आली आहे व याबाबतची पोच त्यांच्या दप्तरी दाखल आहे. स्वस्त धान्य दुकानदाराने काही माहिती दिली ती सुध्दा अपिलार्थीस देण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही स्वस्त धान्य दुकानासंदर्भात आहे. या माहितीमध्ये जनहित आहे असे आयोगाचे मत आहे, म्हणून जी माहिती अद्यापपावेतो स्वस्त धान्य दुकानदाराकडून प्राप्त झाली नाही ती सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात मागवून घ्यावी व त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात व तसेच सदरची माहिती स्वस्त धान्य दुकानदार यांनी ठेवली नसल्यास तहसीलदार, मंठा यांनी त्यांच्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही करणे योग्य ठरेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, मंठा, तालुका मंठा, जिल्हा जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित करुन अपिलार्थी तसेच स्वस्त धान्य दुकानदार यांना कळवून स्वस्त धान्य दुकानदाराकडील उर्वरीत माहितीची

अपिलार्थीस पाहणी द्यावी व पाहणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्राच्या छायांकीत प्रती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही बाब तहसीलदार, मंठा यांनी पहावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय शिवाजीराव वायाळ, मु. पो. पांगरी बु., तालुका मंठा, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, मंठा, तालुका मंठा, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मंठा, तालुका मंठा, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संजय रामभाऊजी राऊत,<br>घर क्रमांक ०१/१३/४३, राऊत नगर, जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर भूमापन अधिकारी, भूमि अभिलेख, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजय रामभाऊजी राऊत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर भूमापन अधिकारी, भूमि अभिलेख, औरंगाबाद<br>- श्री. का. बा. शिंदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद - श्री. एम. ए. सय्यद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी त्यांच्या दिनांक ११-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये सिटी सर्व्हे नंबर १३९१८ ब ही मिळकत पत्रिका कशाच्या आधारे बनविली याबाबतची माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, सदरची माहिती अभिलेखात उपलब्ध नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-११-२००९ रोजी माहितीबाबत कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १६-०२-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, मंत्रालयातून माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. सदरच्या कागदपत्राच्या अभिलेख्याची तपासणी करता त्यांच्या असे दृष्टोत्त्पतीस आले आहे की, सदरची घेतलेली नोंद त्यांच्या मागील कागदपत्रात उपलब्ध नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची कागदपत्रे उपलब्ध नाहीत ही बाब अपिलार्थीस लेखी कळविण्यात यावी व त्याचप्रमाणे त्यावेळी ज्या अधिका-यांनी अशा नोंदी घेतल्या आहेत त्यांची नावे अपिलार्थीस कळविण्यात यावीत,या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय रामभाऊजी राऊत, घर क्रमांक ०१/१३/४३, राऊत नगर, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अमृतलाल लक्ष्मण भुरेवाले, : अपिलार्थी
पोस्ट ऑफिस रोड, सदर बाजार, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७४२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक भूमि अभिलेख, जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०४-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात मुख्यालय सहायक तथा माहिती अधिकारी, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांनी दिनांक १२-०३-२०१० रोजी प्रथम प्रतिसाद दिल्याचे आढळून येत आहे. त्यांनी नमूद केले आहे की, नगर भूमापन क्रमांक ४००९ व ४०१० च्या फेरफाराच्या नोंदी अद्यापपर्यंत संगणकामध्ये करण्यात आलेल्या नाहीत, फेरफार क्रमांक २३७९४ प्रमाणे संगणक मिळकत पत्रिकेत दुरुस्ती करण्यात आल्यानंतर तात्काळ संगणक प्रती पुरविण्यात येतील. उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगास प्रकरणाची सद्यस्थिती अवगत होत नाही. याकरिता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेणे आवश्यक ठरत आहे.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. अमृतलाल लक्ष्मण भुरेवाले, पोस्ट ऑफिस रोड, सदर बाजार, जालना.

२.	जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राकेश ओमप्रकाश अग्रवाल,रा.जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक मुख्य लिपीक,<br>मा. उच्च न्यायालय, मुंबई (महाराष्ट्र) | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रबंधक (Ins.I.),<br>मा. उच्च न्यायालय,मुंबई (महाराष्ट्र) | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.डी.धोंगडे, उपप्रबंधक (प्रशासन), मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचेतर्फे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खडपीठातील प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १५.०१.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये त्यांनी पूर्वी दाखल केलेल्या दि. ०४.१२.२००९ रोजीच्या अर्जासंदर्भात झालेल्या आदेश/कार्यवाहीची व कार्यालयीन रिमार्कची प्रत तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे पत्र जावक क्र.४६४२/०९ दि. १०.१२.२००९ ची प्रत अशी माहिती मागितली आहे. ही माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. याकरिता या प्रकरणातील सद्यस्थिती अवगत करुन घेण्यासाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी संधी देणे आयोगास आवश्यक वाटत आहे. यास्तव आयोगातर्फे पुढील सुनावणी दिनांक २८ जून, २०१२ रोजी दुपारी ०३.३० वा निश्चित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २८.०६.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राकेश ओमप्रकाश अग्रवाल, द्वारा श्री. अग्रवाल ट्रॅव्हल्स, मस्तगड, मंमादेवी मंदीराजवळ, जालना

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक मुख्य लिपीक,मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक (Inspection-I.), मुंबई उच्च न्यायालय, यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामप्रसाद माधवलाल पोरवाल, : अपिलार्थी
रा.परतूर,जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, परतूर, ता. परतुर,जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामप्रसाद माधवलाल पोरवाल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक निबंधक, सहकारी संस्था, परतूर, ता. परतूर,जि.जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी -श्री. वि.ह.दीक्षित, प्रमुख लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी कथन केले की, त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात झालेल्या सुनावणीच्या झालेल्या निर्णयाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही. ही प्रत त्यांना आज सुनावणीच्या वेळी देण्यात आली. अपिलार्थी यांनी पुढे असेही प्रतिपादन केले की, या पतसंस्थेने शासकीय जमीन घेतली आहे व याबाबतचे पुरावे ते पुढील सुनावणीच्या वेळी सादर करु शकतात. यासाठी पुढील सुनावणी दि.२९.०६.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा.ठेवण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २९.०६.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामप्रसाद माधवलाल पोरवाल,बालाजी मंदीर रोड, मोंढा, परतूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, परतूर, ता. परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जगन्नाथ प्रभाकरराव नवल,<br>रा.सातोना (खु.),ता.परतुर,जि.जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परतुर,<br>ता.परतुर,जि.जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परतुर, ता.परतुर,जि.जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. व्ही.डी. जायभाये, शिक्षण विस्तार अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी- श्री. एन.के.देशमुख, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती संकलीत करुन दि. ०४.१२.२०१२ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. ही माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तीशः स्वीकारली असून याबाबतची पोच दिलेली आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी, असे आयोगाचे निर्देश आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जगन्नाथ प्रभाकरराव नवल,मु.पो. सातोना (खू.), ता.परतूर,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परतुर, ता.परतुर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, जालना यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपिलार्थी
रा.पाथरवाला (बु.),
ता.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन),
जिल्हा परिषद, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शामराव सुंदरराव खरात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जालना - श्री. ए.एच.आडेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),जिल्हा परिषद, जालना - श्री. पी. आर. सवडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी कथन केले की, त्यांनी दि. १७.१२.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये डॉ. भालेराव,जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्या शासकीय कामकाजाबाबत एकूण सात मुद्यांवर माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दि. ०१.०४.२००६ ते दि. १७.१२.२००९ असा आहे. अद्यापही त्यांना माहिती मिळालेली नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर विलंबाने निर्णय दिला आहे. या निर्णयाद्वारे सात दिवसांचे आत माहिती द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहितीचा अर्ज कलम ६(३) नुसार दि. २३.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये पशुसंवर्धन विभागास हस्तांतरित केला आहे. पुढे त्यांनी असेही कथन केले की, पशुसंवर्धन खात्यातील जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०१.२०१० रोजी रु. १६१ रुपयांचा भरणा करण्याकरिता पृष्ठसंख्येच्या व पोस्टेजच्या तपशीलासह कळविले आहे. हे पत्र अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविण्यात आले आहे. त्यासंदर्भातील पोच त्यांच्याकडे उपलब्ध आहे. अपिलार्थी यांना सदरचे पत्र मिळाले नाही, असे त्यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे माहिती मागितली आहे. माहिती पशुसंवर्धन विभागाची आहे. माहितीचा अर्ज कलम ६(३) नुसार वर्ग करण्यात आला आहे. पशुसंवर्धन खात्याच्या जन माहिती अधिकारी यांनी शुल्काचा भरणा करावा, असे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे कळविलेले आहे. तथापि अंशतः विलंब झाल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर विनामूल्य माहिती द्यावी, असा निर्णय घेतला आहे.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखात जी माहिती उपलब्ध आहे, ती अपिलार्थीस देय होत आहे. माहिती संकलीत करुन देणे अभिप्रेत नाही. प्रश्नार्थक,खुलासेवजा माहिती वगळून अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस तीस दिवसांचे आत विनामूल्य पाठविण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (साप्रवि),जिल्हा परिषद,जालना यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी वर नमूद केल्याप्रमाणे त्यांना देय होत असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शामराव सुंदरराव खरात,मु. पो. पाथरवाला (बु.), ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बाबुराव गोविंदराव सुर्यवंशी, | : | अपिलार्थी |
| रा.जालना | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, | | |
| जिल्हा परिषद, जालना | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा), | | |
| जिल्हा परिषद, जालना | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जालना - श्री. ए.एच.आडेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),जिल्हा परिषद, जालना - श्री. पी. आर. सवडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर प्रथमतः दि. २७.०१.२०१० रोजी माहिती विनामूल्य समक्ष देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे उर्वरित माहिती दि. २८.०१.२०१० रोजी देण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण,दिशाभूल करणारी मिळाली आहे, असे मोघमपणे नमूद केल्याचे दिसून येत आहे. नेमके नमूद केलेले नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबुराव गोविंदराव सुर्यवंशी, मु.पो.इतवारा गल्ली, पंचमुखी महादेव मंदिराजवळ, जुना जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजाराम रंगनाथ कांबळे,<br>रा.वलखेड, ता.परतुर,<br>जि.जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>बाल विकास प्रकल्प अधिकारी,<br>एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, परतुर,<br>ता.परतुर,जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण),<br>जिल्हा परिषद, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजाराम रंगनाथ कांबळे | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील ॲड. व्ही. पी.कदम | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, परतुर, ता. परतुर, जि.जालना - श्री. राठोड व्ही.एस. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण),जिल्हा परिषद, जालना - श्री. अनुप शेंगुलवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०२.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०९.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे वकील, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्यातर्फे वकिलांनी युक्तिवाद सादर केला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०६.०२.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये एकूण १९ मुद्यांवर एकात्मिक बालविकास सेवा योजना, परतुर कार्यालयातील माहिती मागितली आहे. सदरची माहिती सर्वसाधारणपणे २००१-०२ ते २०१० या कालावधीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा आढावा घेतला व त्यांना असे आढळले की, मागितलेल्या माहितीची पृष्ठसंख्या २३,७४७ होत आहे. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत व त्यांना माहिती विनामूल्य अनुज्ञेय आहे.तथापि इतके अनुदान त्यांच्याकडे उपलब्ध नाही म्हणून माहिती देता आली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली आहे. त्यावेळी अपिलार्थी व त्यांचे वकील उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णयामध्ये नोंद घेतली आहे की, जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे माहितीची पाहणी देऊन त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती देण्यात येतील, असे अर्जदारास कळविलेले आहे. त्यासंदर्भातील पोस्टाचा दाखला अभिलेखात उपलब्ध आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीची पाहणी द्यावी, असा निर्णय घेतलेला आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जामध्ये मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठी आहे व कालावधी दहा वर्षांचा आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहितीची पाहणी देण्याकरिता घेतलेली भूमिका माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९)नुसार योग्य ठरत आहे.जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात निधी उपलब्ध नाही, ही बाब देखील विचारात घेणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 2(j) मध्ये माहितीच्या अधिकाराची व्याख्या आहे. त्यामध्ये माहिती मिळविण्याकरिता विविध पर्याय दिलेले आहेत.त्यामध्ये पहिला पर्याय हा माहितीची

पाहणी देणे हा आहे. यावरुन माहितीची पाहणी दिली म्हणजे माहिती दिली असा अर्थ होतो. याकरिता अपिलार्थीस माहितीची पाहणी देण्याकरिता अंतिम संधी देण्यात यावी व त्याबाबत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे व त्यातील काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. अधिनियमातील कलम ३ नुसार माहितीचा अधिकार प्रत्येक नागरिकास राहील, म्हणून सदरच्या माहितीची पाहणी अपिलार्थीस अनुज्ञेय राहील. त्यांच्या प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही, याची नोंद अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, परतूर, जि.जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजाराम रंगनाथ कांबळे, रा. वलखेड, ता.परतूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी,एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, परतुर, ता. परतुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. घनश्याम शाहुराव साबळे, : अपिलार्थी
रा.खडकेश्वर, पो.ताडहादगाव, ता.अंबड,जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, कार्यालय,
घनसावंगी, ता. घनसावंगी, जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (एकात्मिक बाल विकास
सेवा योजना), जिल्हा परिषद, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. घनश्याम शाहुराव साबळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, घनसावंगी, ता. घनसावंगी, जि.जालना - श्री. व्ही. एल.परदेशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परिषद, जालना - श्री. अनुप शेंगुलवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०१.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये दि.१ नोव्हेंबर १९९४ च्या शासन निर्णयानुसार विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. मागितलेल्या माहितीचा कालावधी नमूद केलेला नसल्यामुळे नेमक्या कोणत्या कालावधीची माहिती आवश्यक आहे, ही बाब अपिलार्थीस दि. ०६.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे विचारण्यात आली आहे. त्यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय, सन २००२ पासून स्थापन झालेले आहे. या बाबी विचारात घेता एक दिवस निश्चित करुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित अभिलेखाची अपिलार्थीस पाहणी द्यावी व अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्यात यावी, तसेच यासंदर्भात अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळविण्यात यावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, घनसावंगी, जि.जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती सशुल्क द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. घनश्याम शाहुराव साबळे, मु.खडकेश्वर, पो.ताडहादगाव, ता.अंबड,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवायोजना, घनसावंगी, ता. घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश दगडु सुरडकर, : अपिलार्थी
रा.कुंभारी, पो.ता.भोकरदन, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, वाळसा (व.), ता.भोकरदन,
जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भोकरदन, ता.भोकरदन,जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाळसा (व.), ता.भोकरदन, जि.जालना - श्री. महेंद्र आनंदराव साबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भोकरदन, ता.भोकरदन,जि.जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा, वाळवा (व.), ता.भोकरदन, जि.जालना श्री. नारायण पांडुरंग पोटे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.१२.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा समिती,वाळसा (व.), ता.भोकरदन, जि.जालना उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे अभिलेखे लेखापरिक्षणाकरिता जिल्हा परिषदेकडे दाखल केले होते. आता ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी उपलब्ध आहे. या बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती, अपिलार्थी यांनी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात अन्यथा सशुल्क द्याव्यात. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, वाळसा (व.), ता.भोकरदन, जि.जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थी यांनी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास त्यांना विनामूल्य द्याव्यात अन्यथा सशुल्क द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश दगडू सुरडकर, रा. कुंभारी (आंबेडकरनगर), पो.ता.भोकरदन, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय, वाळसा (व.), ता.भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, भोकरदन, ता.भोकरदन,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. साहेबराव दासु राठोड, : अपिलार्थी
रा.विरेगाव तांडा,
ता.घनसावंगी,जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, विरगव्हाण तांडा,
ता. घनसावंगी, जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी,
जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, विरेगाव तांडा, ता. घनसावंगी, जि.जालना - श्री. नागरे यु.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, घनसावंगी, जि.जालना - श्री. जाधव आर.एल. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०३.२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६.०४.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ०४.०१.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत विरेगाव ता. घनसावंगी जि.जालना येथील विविध कामांची सन २००१ ते २०१० अशा दहा वर्षांची संपूर्ण माहिती मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस दि. २९.०४.२०१० रोजी समक्ष देण्यात आली आहे. त्याबाबतची लेखी पोच अपिलार्थी यांनी दि. २९.०४.२०१० रोजी दिलेली आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०४-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साहेबराव दासू राठोड, रा.विरेगाव तांडा, ता. घनसावंगी, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, विरेगाव तांडा, ता. घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तिवारी विद्याधर प्रसाद रामप्रसाद, : अपिलार्थी
घर नं. ३-२-१९४, शिवाजी हौसिंग सोसायटी, बसस्टॅंड समोर, उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षण उपसंचालक, गांधी चौक, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३७९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४-०८-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-०८-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०९-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १३-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येऊन सुनावणी दिनांक २३-०२-२०१२ रोजी ठेवण्यात आली होती. दिनांक २३-०२-२०१२ रोजी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. मागील सुनावणीच्या वेळी नमूद केलेल्या दोन मुद्दयांच्या संदर्भातील नस्ती व मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रतीचा संच घेऊन आयोगासमोर उपस्थित राहण्यासाठी त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही.

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २७-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तिवारी विद्याधर प्रसाद रामप्रसाद, घर नं. ३-२-१९४, शिवाजी हौसिंग सोसायटी, बसस्टँड समोर, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, गांधी चौक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, : अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.आर.पाटील, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.०६.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४.०८.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांना त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना मिळाली आहे. तथापि त्यातील मुद्दा क्र. ३ ची माहिती मिळालेली नाही. ज्यामध्ये दि. २४.०४.२००३ च्या पत्रासंदर्भात मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केलेल्या अहवालाची प्रत मागितली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.),जि.प.जालना यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, दि. २४.०४.२००३ च्या संदर्भातील माहिती मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी यांनी परस्पर द्यावी. मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी यांनी दि. १६.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस सदरची कागदपत्रे गहाळ झाली असून त्यावर यापूर्वीच कार्यवाही सुरु आहे, असे कळविले असल्याचे दिसून येत आहे.

या बाबी विचारात घेता सदर अपील या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, द्वारा एस.के.जोनवाळ, प्लॉट नं. ४, प्रा. रावसाहेब ढवळे यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तांदळे उध्दव किसनराव, : अपिलार्थी
तांदळे निवास, हनुमान चौक, शाहुनगर, जालना रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड - श्री. आत्माराम रंगनाथ वाघमारे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०८-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०४-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०६-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२९-०१-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २४-०२-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थीच्या दिनांक ०८-०४-२००९ च्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद, अपिलार्थी यांचे दिनांक ०४-०५-२००९ चे प्रथम अपील व त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय यांच्या प्रती, आयोगास सादर करणे आवश्यक होते त्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी काही कालावधी देण्याची विनंती केली. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन प्रकरणात सुनावणीकरिता आज रोजीची तारीख देण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड यांनी अपिलार्थीस कळविले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रती मा. कोर्टाच्या सिव्हील तरतुदीनुसार त्यांना देय होऊ शकतात आणि त्या प्राप्त करुन घ्याव्यात. सदरची बाब जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना नमूद करुन प्रथम अपील फेटाळले आहे.

अपिलार्थी मागील सुनावणीस अनुपस्थित होते व आजही ते अनुपस्थित आहेत. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती. तथापि ते अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तांदळे उध्दव किसनराव, तांदळे निवास, हनुमान चौक, शाहुनगर, जालना रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामराव नागनाथ नागापुरे, : अपिलार्थी
व्दारा पत्रकार सुधीर रामराव नागापुरे, खंडोबा मैदान,
माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई, जिल्हा बीड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२६

२ सुनावणीची तारीख दि. १०-०४-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ अपिलार्थी यांचे प्रतिनिधी - श्री. सुधीर नागापुरे : उपस्थित

३.३ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
माजलगांव, जिल्हा बीड - श्री. शिंदे नवनाथ ज्ञानोबा

३.४ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई, जिल्हा बीड

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २४-०८-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. ०५-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०२-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २४-०२-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २४-२-२०१२ रोजीच्या पत्राद्वारे सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली होती ती मान्य करुन प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता त्यांना एक संधी देण्यात येऊन प्रकरणात सुनावणीकरिता आज रोजीची तारीख देण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १०-०४-२०१२ च्या पत्रान्वये ते आजारी असल्यामुळे उपस्थित राहू शकत नाही असे आयोगास कळविले आहे. त्यांच्यातर्फे त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. सुधीर नागापुरे यांना मान्यता देण्याची विनंती केली आहे. त्यांनी केलेली विनंती मान्य करण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १०-०४-२०१२ रोजीचे पत्र आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या घरी येऊन समक्ष माहिती दिली आहे त्यामुळे त्यांचे समाधान झाले आहे असे कळविले आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामराव नागनाथ नागापुरे, व्दारा पत्रकार सुधीर रामराव नागापुरे, खंडोबा मैदान, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२.	जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विठ्ठल बळीराम शेंडगे,<br>रा. तेलगांव (खुर्द), पो. तालखेड, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, माऊली माध्यमिक विद्यालय, एकदरा, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, माऊली माध्यमिक विद्यालय, एकदरा, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-१२-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०२-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २४-०२-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २३-०२-२०१२ रोजीच्या पत्रान्वये सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली होती ती मान्य करण्यात येऊन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता त्यांना एक संधी देण्यात येऊन प्रकरणात सुनावणीकरिता आज रोजीची तारीख देण्यात आली आहे.

आज रोजीही सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २४-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये १९९५ पासून ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत अशी १६ वर्षाच्या कालावधीची माऊली माध्यमिक विद्यालय, एकदरा, तालुका माजलगांव, जिल्हा बीड या शाळेची माहिती मागितली आहे. यापैकी ब-याचशा मुद्दयावर प्रश्नार्थक अशी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) नुसार माहितीच्या व्याख्येत ही बाब येत नाही म्हणून ती माहिती अपिलार्थीस देय होत नाही.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती पाहता अपिलार्थीने फार मोठ्या कालावधीची व विविध मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत. याकरिता अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली १/२ मुद्दयाची नेमकी माहिती मागवावी व तसे जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावे व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माऊली माध्यमिक विद्यालय, एकदरा, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस पुढील पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विठ्ठल बळीराम शेंडगे, रा. तेलगांव (खुर्द), पो. तालखेड, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माऊली माध्यमिक विद्यालय, एकदरा, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नवाजखाँ सुलेमानखाँ, : अपिलार्थी
मु. पो. जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना<br>- श्री. एम. आर. सिध्दिकी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. के. बी. गायकवाड, उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २५-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये जाफ्राबाद सार्वजनिक बांधकाम उपविभागाअंतर्गत सन २००८-०९ मध्ये झालेल्या व अपूर्ण विकास कामांची माहिती आणि त्यावरील खर्च, नवीन चालू असलेल्या विविध योजनेअंतर्गत कामांची माहिती, सर्व कामांचे अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका, साईट सांभाळणा-या अभियंत्याचे नाव, त्यांचे मूळ गाव इत्यादीच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला व दिनांक ०५-०४-२०१० रोजी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. तथापि त्यांना परिपूर्ण माहिती मिळाली नाही असे त्यांनी मोघमपणे नमूद केले आहे नेमके नमूद केलेले नाही. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नवाजखॉं सुलेमानखॉं, मु. पो. जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे,<br>कांवदी गल्ली, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना<br>- श्री. ए. एस. माने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. गायकवाड के. बी., भागवत पी. जी., उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बदनापूर मार्फत दिनांक ०१ जानेवारी २००८ ते दिनांक १७-०२-२०१० या कालावधीत करण्यात आलेल्या संपूर्ण विकास कामांची माहिती मागितली आहे. यामध्ये प्रशासकीय व तांत्रिक आदेश क्रमांक, दिनांक, कामावर झालेला खर्च, कामांची सद्यस्थिती, नियंत्रण करणा-या अधिका-याचे नाव, दौरा कार्यक्रम, सेवापुस्तिकाच्या प्रती इत्यादीची माहिती मागितली आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ च्या माहितीची सी डी मागितली आहे. अपिलार्थीने मोठ्या प्रमाणावर माहिती मागितली असल्याने ती संकलीत करण्यासाठी काही कालावधी लागला व दिनांक ०७-०५-२०१० रोजी अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. तथापि त्यांना विलंबाने माहिती मिळाली असे त्यांनी नमूद केले आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ नुसार एका महिन्यात माहिती संकलीत करुन देणे शक्य नव्हते,हा जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आयोगास पुरेसा वाटतो त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे, कांवदी गल्ली, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख खालेक शेख अहेमद, : अपिलार्थी
मु. पो. कुरेशी गल्ली, वॉर्ड क्रमांक ५, परतूर,
तालुका परतूर, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर,
जिल्हा जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>स्वच्छता निरिक्षक, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर,<br>जिल्हा जालना - श्री. एम. एच. तुंगनवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर,<br>जिल्हा जालना - श्री. सी. पी. सोनवणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०४-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना माहिती मिळाली नाही असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी दिनांक १६-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये नगरपरिषद, परतूर अंतर्गत अतिक्रमणाबाबत त्यांनी केलेल्या अर्जासंदर्भात कार्यवाही तसेच वॉर्ड क्रमांक ५ मध्ये केलेल्या मुरुमाच्या भरावाचे काम इत्यादीबाबतची विविध माहिती मागितली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख खालेक शेख अहेमद, मु. पो. कुरेशी गल्ली, वॉर्ड क्रमांक ५, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा स्वच्छता निरिक्षक, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. फेरोज अली शब्बीर अली,<br>रॉयल हॉटेल, रेल्वे स्टेशन समोर, जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग, नगर परिषद, जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग, नगर परिषद, जालना<br>- श्री. बी. एस. पोलास | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये जालना नगर परिषदने सन २००३ ते २००४ मध्ये विद्युत पुरवठ्यासाठी किती सामग्री खरेदी केली त्याची रक्कम, त्याचा वापर कोठे करण्यात आला, कर्मचा-यांचा तपशील इत्यादी विस्तृत अशी पाच वर्षाची माहिती मागितली आहे. सदर माहितीची व्याप्ती मोठी असल्यामुळे ती संकलीत करण्यास कालावधी लागेल याची कल्पना अपिलार्थीस देण्यात आली होती. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, माहिती व्यापक स्वरुपाची असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसात अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार अपिलार्थीस कार्यालयात माहितीची पाहणी देण्यात आली होती.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी व्दितीय अपिलामध्ये त्यांना माहिती मिळाली नाही असे नमूद केले आहे. ही बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग, नगर परिषद, जालना यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. फेरोज अली शब्बीर अली, रॉयल हॉटेल, रेल्वे स्टेशन समोर, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजबिंडे गणेश सिताराम, : अपिलार्थी
मु. श्रीधर जवळा, पो. केधळी, तालुका परतूर,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
लि. स. सु. उपविभाग, परतूर, तालुका परतूर,
जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
जालना-२

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७५६

२ सुनावणीची तारीख दि. १०-०४-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
लि. स. सु. उपविभाग, परतूर, तालुका परतूर,
जिल्हा जालना - श्री. प्रकाश रामकृष्णराव तौर

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
जालना-२

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १२-०१-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १५-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये परतूर तालुक्यातील पाच पुनर्वसित गावांमध्ये झालेल्या कामांबाबतची माहिती मागितली आहे. सदरच्या माहितीची पाहणी अपिलार्थीस देण्यात आली. तथापि अपिलार्थी यांनी त्यांना इतर गावाबाबतच्या माहितीची आवश्यकता नाही व त्यांना केवळ त्यांच्या गावाच्या माहितीची आवश्यकता आहे असे कळविले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहे. त्यांच्या व्दितीय अपिलावरुन अपिलार्थी यांनी परतूर तालुक्यातील श्रीधर जवळा, वैजोडा, नागापूर, पाडळी व रोहिणा या गावाकरिता देण्यात आलेल्या विद्युत पुरवठ्याची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. माहिती व्यापक स्वरुपाची मागितल्याचे दिसून येत आहे. याकरिता अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे ही बाब त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी. व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. स. सु. उपविभाग, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस पुढील पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०४-२०१२**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजबिंडे गणेश सिताराम, मु. श्रीधर जवळा, पो. केधळी, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. स. सु. उपविभाग, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जालना-२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एम. एस. सिद्दीकी, : अपिलार्थी
मु. पो. जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद,
तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा आरोग्य अधिकारी, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७५७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. एम. एस. सिद्दीकी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना - डॉ. मोटे एम. एल. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जाफ्राबाद तालुक्यातील सन २००५ ते २००९ या कालावधीतील पाच वर्षाची विविध ४ मुद्दयावरील माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात ही बाब मान्य केली. अपिलार्थी यांनी तालुका आरोग्य अधिकारी, जाफ्राबाद यांना माहिती मिळाल्याबाबतची पोच दिल्याचे पत्र आयोगासमोर आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्क्र्षाप्रत आयोग येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एम. एस. सिद्दीकी, मु. पो. जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देवलाल सांडु आकोदे, : अपिलार्थी
मु. पो. हसनाबाद, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती, भोकरदन, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७५८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती, भोकरदन, तालुका भोकरदन,<br>जिल्हा जालना | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,<br>तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (7) व19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये आयोग उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, जालना यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देवलाल सांडु आकोदे, मु. पो. हसनाबाद, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद,

जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भाऊसाहेब कडुबा पाटील फुकट,<br>मु. पो. कुंभारी, तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,<br>तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भाऊसाहेब कडुबा पाटील फुकट | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,<br>तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,<br>तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. बी. एस. कपे, कार्यालय अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झालेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी नुकताच कार्यभार घेतला आहे. त्यामुळे त्यांना सदर प्रकरणाच्या सद्यस्थितबाबत माहिती नाही.

या सर्व बाबी विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये आयोग उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, जालना यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०५-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भाऊसाहेब कडुबा पाटील फुकट, मु. पो. कुंभारी, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश विष्णु दौंड, : अपिलार्थी
इंदानी कॉलनी, पाचोड रोड, अंबड, तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मसई, तालुका अंबड,
जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड,
जिल्हा जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७६० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रकाश विष्णु दौंड | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मसई, तालुका अंबड,<br>जिल्हा जालना - श्री. एस. एस. नारनवरे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड,<br>जिल्हा जालना - श्री. बी. जे. गुंजाळ | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०६-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०५-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २२-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी ग्रामपंचायत, मसई, तालुका अंबड अंतर्गत सन २००८ ते २०१० या कालावधीत झालेल्या कामाबाबत माहिती मागितली आहे. सदरची माहिती आतापर्यंत त्यांना प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितली असल्याने व त्यांच्या कार्यालयास अपिलार्थी यांनी कोणताही संपर्क न साधल्याने त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना अपिलार्थीस देता आली नाही.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर घेतलेला निर्णय योग्य नाही असे आयोगाचे मत आहे.

या सर्व बाबी आयोगास गंभीर वाटतात आणि याची गंभीर दखल आयोगातर्फे घेण्यात येत आहे.

या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (7) व 9 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये आयोग उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, जालना यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०५-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश विष्णु दौंड, इंदानी कॉलनी, पाचोड रोड, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मसई, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माधवराव गोविंदराव एडके, : अपिलार्थी
मु. वडाळा, पो. माहोरा, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद, जालना

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७६१

२ सुनावणीची तारीख दि. १०-०४-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
उप अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना
- श्री. आर. टी. तायडे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
कार्यकारी अभियंता, सिंचन, जिल्हा परिषद, जालना

३.४ जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एम. के. सापधरे, उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना : उपस्थित

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. ०५-११-२००९

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थीस यापूर्वी दिलेल्या अर्जासंदर्भात अशी माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०५-११-२००९ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भातील माहिती तयार ठेवण्यात आली होती तथापि अपिलार्थीने सदर माहिती कार्यालयात उपस्थित राहून घेतली नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी मौजे वडाळा शिवारातील गट नंबर ७१ संबंधी माहिती सत्यप्रतीत मागितली आहे. अपिलार्थी यांनी टपालाव्दारे माहिती मागितली आहे असे त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांनी सकृतदर्शनी अपिलार्थीस माहिती पाठविल्याचे दिसून येत नाही. याकरिता संपूर्ण माहितीच्या झेरॉक्स प्रतीचा संच अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविण्यात यावा व त्याचप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार माहिती न पुरविल्यामुळे त्यांना रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद , जालना यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद , जालना यांची राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२.	संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद , जालना यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. माधवराव गोविंदराव एडके, मु. वडाळा, पो. माहोरा, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२.	जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अजित किसनलालजी कोठारी, | : | अपिलार्थी |
| | रा.जालना. | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | नगर अभियंता, | | |
| | नगर परिषद, जालना | | |
| | जन अपिलीय अधिकारी, | : | |
| | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, जालना | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर अभियंता(पा.पु.), नगर परिषद, जालना - श्री. आर.यु. बगळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जालना - श्री. आर.जी.कानडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,नगर परिषद, जालना,कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग,जालना उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १५.०२.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये नगर पालिका, जालना अंतर्गत विंधन विहिरीसंदर्भात एकून नऊ मुद्यांवर माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दि. ०१.०१.१९८० ते १५.०२.२०१० असा वीस वर्षांचा आहे. हा अर्ज अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जालना यांच्याकडे केला. सदरची माहिती नगर पालिका, जालनाशी संबंधित असल्यामुळे सदरचा अर्ज दि. १०.०३.२०१० रोजी नगर पालिका, जालना कार्यालयातील जन माहिती अधिकाऱ्याकडे पाठविण्यात आला. यावर दि. १५.०५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता यांनी माहिती दिली आहे. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाली आहे. तथापि ती अपूर्ण आहे व मागितलेल्या माहितीशी सुसंगत नाही. अपिलार्थी यांनी प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,जालना यांच्याकडे केलेले आहे. त्यावर सुनावणी झालेली नाही. आज रोजी युक्तिवादात कथन करण्यात आले आहे की, सदरील प्रकरणासंदर्भात जन अपिलीय अधिकारी हे मुख्याधिकारी, नगर पालिका, जालना होतात. तथापि त्यांच्याकडे प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये विंधन विहिरीबाबत जालना जिल्हयातील माहिती मागितली आहे. या माहितीमध्ये व्यापक जनहित आहे. ही बाब विचारात घेता अपिलार्थीच्या दि.१९.०३.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पालिका, जालना यांनी निर्णय घेणे आयोगास आवश्यक वाटते. राज्य माहिती आयोगास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना (श्री. बाबासाहेब मनोहरे) यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन मुद्देनिहाय निर्णय द्यावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पालिका, जालना यांनी अपिलार्थी यांच्या दि. १९.०३.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन मुद्देनिहाय निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अजित किसनलालजी कोठारी, घर नं. २.२०.१५, पारसीगल्ली, बेंझजी रोड, काद्राबाद,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पालिका, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश गंगाराम बनकर, : अपिलार्थी
रा. ताडकळस, पो. सिपोरा(बाजार),
ता.भोकरदन, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन,
जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी, ता. भोकरदन, जि.जालना - श्री. बाबुसिंग दलसिंग राठोड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, भोकरदन,जि.जालना - श्री. माधव सुभाषराव बोईनवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यासंदर्भात पोच दिलेली आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन दि. १३.०७.२०१० रोजी अपिलार्थी यांनी तालुका कृषि अधिकारी, भोकरदन यांना त्यांनी माहिती अधिकाराच्या अर्जामध्ये मागितलेली संपूर्ण माहिती मिळाली असल्याची पोच दिल्याचे दिसून येत आहे.

या बाबी विचारात घेता प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश गंगाराम बनकर,रा. ताडकळस, पो.सिपोरा(बाजार),ता.भोकरदन,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विलास शंकरराव कुलकर्णी, | : | अपिलार्थी |
| | रा. कुंभार झरी, ता. जाफ्राबाद, जि.जालना | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विलास शंकरराव कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय,जाफ्राबाद, जि.जालना- सौ. व्ही.एस.शेडोळकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना - श्री. कृष्णकांत चिकुर्ते | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे आयोगातर्फे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीअर्जाद्वारे त्यांच्या स्वतःच्या जमिनीबाबत दि. ४/६/१९८६ रोजी झालेल्या पंचनाम्याच्या नकलेच्या व त्यासंदर्भातील इतर कागदपत्रांच्या प्रती मागितल्या आहेत.

सदरच्या माहितीच्या अभिलेखांचा शोध घेऊनही माहितीशी संबंधित अभिलेखे उपलब्ध झ ाले नाहीत. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडील लोकशाही दिनात केलेल्या अर्जानुसार सन २००५ मध्ये त्यांना माहिती प्राप्त झाली आहे. तथापि त्यानंतर माहिती मागितली असता माहिती उपलब्ध होत नाही. ही बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय,जाफ्राबाद, जि.जालना यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा दोन कर्मचाऱ्यांचा गट तयार करुन शोध घ्यावा व प्राप्त झालेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय,जाफ्राबाद, जि.जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास शंकरराव कुलकर्णी,मु.पो.कुंभार झरी, ता.जाफ्राबाद, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय,जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामेश्वर भिकाजी गाढेकर, : अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, सिल्लोड, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७६५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामेश्वर भिकाजी गाढेकर | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व जन अपिलीय अधिकारी अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची आयोग गंभीर दखल घेत आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २२.०२.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये खालील माहिती मागितली आहे.

" १) सताळ पिंप्री शिवार ता. फुलंब्री पूर्वी ता.सिल्लोड येथील सर्वे नं.४५ च्या हक्क नोंदणीपत्रकाची नक्कल.

२) 'क' आणि 'ड' पत्रकाची वरील सर्वेनंबरची नक्कल

३) वरील सर्वेनंबरची १९४७ च्या आतील शेतवार पत्रकाची नक्कल

४) खासरा पत्रकाची नक्कल

५) सन १९२० ते १९६० पर्यंत हालप नाम्याच्या नकला

६) नमुना हक्क नोंदणी नंबर १ ची वरील सर्वे नंबरची नक्कल

७) नमुना नंबर २ चा फेरफार नक्कल

८) पाहणी पत्रक नमुना नं.३ नक्कल

९) वरील सर्वे नंबरची सन १९२० ते १९५९ पर्यंतच्या फसली नक्कला

१०)पिंप्रीसताळ गट क्र.१११ हे वारसाने उत्तम कचरु पवार यांचे नावे असून कचरु म्हतारबा पवार यांचे आणखी (१) वामन कचरु पवार,(२) बाबू कचरु पवार,(३) गयाबाई राजाराम लहाने हे वारसदार असून त्यांचे नावे नाही. सदरचा फेर क्र. २६२ असून सदरचा खोटा (खोटा दस्ताऐवज) तयार करणारे (१) तहसीलदार (२) मंडळ निरीक्षक (३) तलाठी यांचे संपूर्ण नावे व सध्या नेमणूकीचे ठिकाण द्यावे.

११)शेत गट क्र. १११ चा फेरफार रजिस्टर सिल्लोड तहसील कार्यालयात जमा असल्याचे तलाठी आळंद यांनी आम्हास लेखी पत्रक दिलेले असून त्यांची प्रत यासोबत जोडली आहे.वरील शेत गट क्र. १११ फेरफार रजिस्टरची नक्कल व संबंधित कागदपत्राच्या नकला मिळाव्यात.

१२)मौजे कायगाव शिवार ता. सिल्लोड गट क्र. ५४६ ही जमिन बाबू बचरु पवार यांच्या नावावर असून आल्यापासून "आपतकालीन" महणून सरकारने अनुदान स्वरुपात दिलेल्या रकमा ज्यांचा तपशिल, दिनांक तसेच सदर रक्कमा कोणी घेतल्या त्यांचे नाव देणे.

१३)अव्वल कारकुन श्री. एस.एल.वाटोरे यांना सदर अर्ज स्विकारण्याचा अधिकार आहे काय असेल तर त्यांनी दि. ११-२-१० रोजी सदरचा अर्ज आम्हास स्विकारण्याचा अधिकार नाही म्हणून स्वतः घेतला नाही तसेच इनवर्ड यांना पण घेवू दिला नाही. त्यांना असे करणे योग्य नसेल तर सदर कायदयाप्रमाणे कार्यवाही होवून आम्हास माहिती मिळावी हि विनंती आहे.

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीस अद्यापपावेतो त्यांनी मागितलेली माहिती मिळालेली नाही, असे कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ०५.०४.२०१० रोजी जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सिल्लोड यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे.

"तहसीलदार, सिल्लोड तथा जन माहिती अधिकारी यांनी आपले कार्यालयातील अभिलेख कक्ष सांभाळणाऱ्या लिपीकास आदेशित करुन संबंधित कागदपत्रे अभिलेख कक्षात आहेत की नाही, हे पुन्हा पडताळून पहावे व त्याचप्रमाणे संबंधित कागदपत्रे फुलंब्री तहसीलला वर्ग केले असल्यास कुठल्या पत्राने तसे केले, याची माहिती संबंधित अर्जदारांना देण्यात यावी. माहिती नाकारल्यास योग्य कारण देण्यात यावे."

यानंतरही अपिलार्थीस माहिती मिळालेली नाही, असे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊन प्रकरण नस्तीबध्द केले आहे, ही बाब यथोचित नाही. अपिलार्थीला माहिती मिळणे हा अंतिम उद्देश आहे. अंतिमतः ही जबाबदारी कार्यालय प्रमुखाची आहे. अतः राज्य माहिती आयोगास अधिनियमातील कलम 19(8)(a) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार या प्रकरणात अतिरिक्त जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड, जि.औरंगाबाद तसेच तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांची बाजू ऐकून घ्यावी व अपिलार्थीस माहिती मिळेल असे पहावे. या प्रकरणी विलंब झालेला आहे. संबंधितांवर विभागीय चौकशी करणे क्रमप्राप्त झाल्यास तशी कार्यवाही करण्यात यावी, अशीही अधिनियमातील २०(२) अन्वये जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना शिफारस करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अतिरिक्त जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेवर वर नमूद केल्याप्रमाणे जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी या प्रकरणात विशेष सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती मिळण्याची तजवीज करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामेश्वर भिकाजी गाढेकर, रा. जयश्री मेडीकल चंदनझिरा, जालना, ता.जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल गफार पि. महंमद गौस, : अपिलार्थी
रा.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी,
सजा मानेपुरी, ता.घनसावंगी, जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, घनसावंगी, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म), घनसावंगी, जि.जालना - श्री. एल.डी.सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, घनसावंगी, जि.जालना - श्री. संतोष गोरड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांनी तलाठी मानेपूरी ता. घनसावंगी यांनी स.नं.९३ मधील घेतलेल्या फेर नं. ३२,३३,२६ व ४५ ची माहिती मागितली. या माहितीचा कालावधी सन १९७९-८० ते १९९०-९१ असा आहे. माहिती जुनी असल्यामुळे उपलब्ध करुन देण्यास काही कालावधी लागला. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, घनसावंगी, जि.जालना यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेण्याकरिता अपिलार्थीस नोटीस पाठविली तथापि ती विनातामिली त्यांच्याकडे परत प्राप्त झाली आहे. त्यामुळे सुनावणी होऊ शकली नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना माहिती प्राप्त झाली नाही, असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना या माहितीच्या झेरॉक्स प्रती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन महिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय घनसावंगी, जि.जालना यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल गफार पि. महंमद गौस,रा.देशमुख गल्ली,अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नईमखान गफ्फारखान पठाण,<br>रा. जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>भूमि अभिलेख, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>भूमि अभिलेख, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधीक्षक, भूमी अभिलेख, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एच.जे.घारे, उपअधीक्षक, भूमी अभिलेख, जाफ्राबाद,जि.जालना | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी स.नं. २३३ व २२८ ही जागा मस्जीद इनाम अबासीया असून त्यामध्ये बेकायदेशीरपणे लावलेल्या सिटीएस चे क्रमांक व त्यासंदर्भातील तपशील अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी स्वत: माहिती घेणार आहेत.अपिलार्थीच्या दि. ०३.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार या प्रकरणी जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने यथोचित निर्णय पारित करावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांनी अपिलार्थीच्या दि.०३.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नईम खान गफ्फार खान पठाण, बैदपुरा,सदर बाजार, जालना-४३१२०३.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अनिल अंबादास मते,<br>रा. वडीकाळया, पो. सुखापुरी, ता.अंबड,<br>जि.जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी,<br>जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा समादेशक, होमगार्ड कार्यालय, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अनिल अंबादास मते | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासिक अधिकारी, होमगार्ड जालना - श्री. डी.बी.मोहिते | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा समादेशक होमगार्ड, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ माहिती अर्जान्वये, "मा. आमदार जालना, कैलास गोरंटयाल यांचे पत्र दि. १८.१२.२००० नुसार व मा. ना. राजेश टोपे, राज्य मंत्री म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. १६३५/२००१,दि. २३.०४.२००१ व तसेच पत्र क्र. १८३, दि. २ मे २००१ पत्रानुसार जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय जालना यांच्याकडून हजर करुन घेण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आलेली आहे"- अशी माहिती मागितली आहे. या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा प्रशासिक अधिकारी,होमगार्ड, जालना यांनी दि. १५.१२.२००९ तसेच दि. ०६.०१.२०१० रोजीच्या पत्रानुसार प्रतिसाद दिलेला आहे. सदरचे पत्र वाचनीय नाही, असे दिसून आले आहे. तरी या पत्रांची प्रत्येकी एक प्रत टंकलिखित करुन पुन्हा अपिलार्थीस पाठविण्याची जन माहिती अधिकारी यांनी तयारी दर्शविली. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा प्रशासिक अधिकारी, कार्यालय जिल्हा समादेशक होमगार्ड, जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीची टंकलिखीत प्रत अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिल अंबादास मते, होमगार्ड-शिपाई, रा. वडीकाळ्या, पो. सुखापुरी, ता.अंबड,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासिक अधिकारी,कार्यालय जिल्हा समादेशक होमगार्ड,

जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समादेशक होमगार्ड, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अमृतलाल रामगोपाल शर्मा, : अपिलार्थी
रा. जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रशासकीय अधिकारी,
जिल्हा समादेशक होमगार्डस, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा समादेशक होमगार्डस, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अमृतलाल रामगोपाल शर्मा | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे मदतनीस श्री. अजित कोठारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - प्रशासिक अधिकारी,होमगार्डस्, जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा समादेशक, होमगार्डस्, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे मदतनीस तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.अपिलार्थी ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांनी यापूर्वी होमगार्ड म्हणून केलेल्या सेवेसंदर्भात त्यांच्या दि. ०३.०३.२०१० रोजीच्या मूळ माहितीच्या अर्जाद्वारे- सलग २१ वर्ष होमगार्डस सदस्य म्हणून सेवा बजावलेल्या व वयाच्या ५५ वर्षानंतर सेवामुक्त झालेल्या होमगार्ड स्वयंसेवकांना सानुग्रह अनुदान देणेबाबत सदरील कार्यवाही महासमादेशक मुंबईचा पत्र क्र. ३/०९/१७०० दि. २६.०५.२००९ प्रमाणे व संदर्भिय पत्रकानुसार मानधन मिळण्यास पात्र जालना शहर व तालुक्यातील स्त्री व पुरुष होमगार्डस् व्यक्तींची प्रमाणित यादी - अशी माहिती मागितली आहे. मागितलेल्या माहितीपैकी जालना जिल्हयाशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली आहे. तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीचे नाव समाविष्ट नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी होमगार्ड म्हणून सेवेत असताना जालना जिल्हयाचे विभाजन झालेले नव्हते. त्यामुळे पूर्वीच्या औरंगाबाद जिल्हयाशी संबंधित माहितीमध्ये अपिलार्थी यांच्या नावाचा समावेश असण्याची शक्यता आहे. ही माहिती संकलीत करुन अपिलार्थीस मिळवून देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास काही कालावधी देण्याची विनंती केली. यास्तव आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीची पुढील तारीख दि. १४.०६.२०१२ दुपारी ०३.३० वा. अशी निश्चित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १४.०६.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अमृतलाल रामगोपाल शर्मा, माजी समादेशक अधिकारी, होमगार्ड, घर नं. १.२०.३१, स्वामी दयानंद मार्ग, सदर बाजार,जालना,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासिक अधिकारी,होमगार्डस्, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समादेशक, होमगार्डस्, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राम गोरखनाथ पार्वे, : अपिलार्थी
रा. चिंचखेड, ता.अंबड,
जि. जालना.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग अंबड,
जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७७० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग अंबड, जि.जालना - श्री. एस.व्ही. पडलवार | : उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग जालना - श्री. एस.एस.धनशेट्टी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०२.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग अंबड यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या गावातील चिंचखेड, ता.अंबड येथील साठवण तलावाचे अंदाजपत्रक, वर्कऑर्डर, उपलब्ध निधी, काम पूर्ण कालावधी इ.मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००७-०८ असा आहे. माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्वरित उपलब्ध नव्हती. प्रकल्पाचा प्रस्ताव मान्यतेच्या टप्प्यावर होता. त्यामुळे माहिती उपलब्ध होण्यास अंशतः विलंब झाला आहे व दि. १०.०५.२०१० रोजी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या छायांकित प्रती तयार आहेत व सदरील माहिती श्री. टी.बी. वाघमारे (क.लि.) यांच्याकडून कार्यालयात येऊन घेऊन जावी, असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. तथापि त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग,जालना यांनी सुनावणी घेऊन दि. २३.०२.२०१० रोजी असा निर्णय दिल्याचे दिसून येत आहे की, मुद्दा क्र. १ व ३ ची माहिती तयार आहे. परंतु अपिलार्थी यांनी माहिती एकत्रित मागितल्यामुळे सर्व माहिती एकत्र करुन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत देण्यात यावी.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडे सुमारे १५० पृष्ठांच्या माहितीचा संच तयार आहे. माहितीचा हा संच अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग अंबड, जि.जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राम गोरखनाथ पार्वे, मु.पो.चिंचखेड, ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, रा. जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२४०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - श्री. एस.एस.धनशेट्टी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. २९.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये - "रो.ह.योजनेअंतर्गत पाझर तलावाचे कामे झाली असून मजूर क्षमता ४६०० व उपस्थित मजूर २३१८ असे दर्शविण्यात आली असून मौ. वाघोली पा.त.क्र.२, अरगडेगव्हाण पा.त.क्र.४, घोणासीतांडा पा.त.क्र.४,माहोरा ४-ड, मोहरवाबळा पा.त.क्र.६, कंडारी-४, सदरील गावात केलेल्या कामे कुशल किती अकुशल किती संपादीत केले असून एकूण क्षेत्र किती, त्यांचा मोबदला किती, मुळ अंदाजपत्रकाची रक्कम किती आपण जिल्हाधिकार्यालय जालना येथे सादर केलेला खालील तारखेतील साप्ताहिक अहवाल व मजूरांचे हजेरीपत्रकाची सत्यप्रत" - अशी माहिती मागितली आहे. या अर्जामध्ये दि. १७ जानेवारी,२००८ ते २३ जानेवारी २००८ असा कालावधी नमूद केलेला आहे. यासंदर्भात काही माहिती संकलीत करुन जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणावर आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.त्याचप्रमाणे माहिती ज्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे, त्या स्वरुपात देणे अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत आहे. माहिती संकलीत करुन देणे अभिप्रेत नाही.

या पार्श्वभूमीवर जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे, त्याच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम,दाना बाजार, जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. निलावाड उत्तम सयाजीराव,<br>रा. अंबाजोगाई, जि.बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल),<br>तहसील कार्यालय, परळी(वै.), जि.बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, परळी (वै.), जि.बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय परळी वै.,जि.बीड - श्री. प्रसाद प्र.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, परळी (वै.), जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस.एम.मुंडे, नायब तहसीलदार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |

या पूर्वी या प्रकरणाची दि. २८.०२.२०१२ रोजी सुनावणी झाली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे सुनावणीसाठी पुढील तारीख निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज दि. ११.०४.२०१२ रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी त्यांच्या कौटुंबिक कारणामुळे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी निवेदन आयोगास सादर केले आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या दि.१५.०९.२००९ रोजीच्या अर्जान्वये "दि. ०६.०३.२००९ व दिनांक २८.०४.२००९ रोजी दिलेल्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीच्या संचिकेतील सर्व नकला, भविष्य निर्वाह निधीमधून (रक्कम) अग्रीम मिळणेबाबत दिलेल्या अर्जाची आणि त्यावर केलेल्या कार्यवाहीच्या सर्व नकला तसेच श्री. एस.एम.मुंडे मंडळ अधिकारी यांची अंबाजोगाई येथे बदली झाल्यानंतर सादर केलेल्या अंतीम वेतन प्रमाणपत्राची व त्या सोबत सादर केलेल्या पत्राची प्रत, मार्च २००९ ते सप्टेंबर २००९ या कालावधीत नायब तहसीलदार (म), अ.का.(म), अ.का. सामान्य, अ.का.लेखा, लेखा लिपीक, आस्थापना लिपीक आणि अभिलेखपाल यांनी ज्या कार्यालयीन आदेशान्वये काम केलेले आहे त्या आदेशाच्या नकला, नकला मिळणेसाठी दिलेल्या अर्जाची नक्कल व अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीच्या संचिकेच्या नकला व नोटींगसह" अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी महसूल विभागातील कर्मचारी असून सध्या मंडळ अधिकारी, ता. अंबाजोगाई येथे कार्यरत आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या निवेदनात नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली आहे तथापि परिपूर्ण मिळाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात दिलेल्या निर्णयामध्ये अपिलार्थीस उर्वरित माहिती द्यावी, असे सूचित केले आहे. त्यांना आजपर्यंत माहिती मिळालेली नाही.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील तसेच अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय परळी वै.,जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते

सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निलावाड उत्तम सयाजीराव, रा. हाऊसिंग सोसायटी, राम सिरसाळकर यांचे घर, अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय परळी वै.जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परळी (वै.), जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. इंदुबाई बापुराव सिरसट, : अपिलार्थी
गजानन नगर, नाळवंडी रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - श्री. बी. बी. सिरसट | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०३-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २८-०२-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

अपिलार्थी ,जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २९-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. इंदुबाई बापुराव सिरसट, गजानन नगर, नाळवंडी रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी, नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जनार्दन गोविंदराव राऊत,<br>रा. परळी वै., जि.बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल),<br>तहसील कार्यालय, परळी वै. जि.बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, परळी वै., जि.बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा),<br>ता. परळी वै. जि.बीड -श्री. एस.एम.मुंडे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वै., जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पी.पी.कुलकर्णी, नायब तहसीलदार(महसूल) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०६.२०१० |

या प्रकरणात यापूर्वी दि.२१.०३.२०१२ रोजी सुनावणी घेण्यात आली होती.त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यांना बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज दि. ११.०४.२०१२ रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १३.१२.२००९ रोजीच्या अर्जान्वये पुरवठा तसेच महसूल विभागाची माहिती मागितली आहे. सदरची माहिती दि. १०.०६.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दिलेली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत.त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली होती. आयोगापुढील कागदपत्रांवरुन त्यांना माहिती दिल्याचे दिसून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी पाठविलेली माहिती अपिलार्थीस पुन्हा एकदा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, परळी वै., जि. बीड यांनी यापूर्वी पाठविलेली माहिती अपिलार्थीस पुन्हा एकदा हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी,

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जनार्दन गोविंदराव राऊत, गुरुकृपा निवास, माधवबाग, परळी वै., जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, परळी वै. जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वै., जि.बीड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ज्ञानेश मुरलीधर ताकट, : अपिलार्थी
विधाते निवास, सतकर कॉम्प्लेक्स च्या पाठीमागे, अंबड रोड, जुना जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, लेखा परिक्षण, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ज्ञानेश मुरलीधर ताकट | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, जालना - श्री. बा. ह. बोडखे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, लेखा परिक्षण, औरंगाबाद - श्री. डी. एम. कांबळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये त्रयस्थाची सेवा विषयक, कार्यविवरणाच्या प्रती, किरकोळ रजा, वैद्यकीय रजा प्रती, प्रवासभत्ता, त्यांच्याविरोधात आलेल्या तक्रारी इत्यादीबाबतची माहिती मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत दिनांक २६-०४-२०१० रोजी माहिती दिली आहे. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाली आहे. तथापि त्यांना खोटी व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली आहे असे त्यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये मोघमपणे नमूद केले आहे. सुनावणीच्या वेळी खोटी व दिशाभूल करणारी माहिती म्हणजे नेमकी कोणती ती ते सांगू शकले नाही. अपिलार्थी यांनी त्रयस्थाची माहिती मागितली अहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (७) व ११ मधील तरतुदीनुसार त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे नैसर्गिक न्याय व पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने आवश्यक असते. ही बाब जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी विचारात घेतली नाही. भविष्यात ही गोष्ट त्यांना विचारात घ्यावी लागेल.

वरील बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानेश मुरलीधर ताकट, विधाते निवास, सतकर कॉम्प्लेक्स च्या पाठीमागे, अंबड रोड, जुना जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, लेखा परिक्षण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाबुराव विठ्ठलराव साळूंके, : अपिलार्थी
रा. गणपती गल्ली, जुना जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
सह आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे-०१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जालना<br>- श्री. बी. एल. मुंढे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे-०१<br>- श्री. व्ही. डी. मराठे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ११-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये कै. नारायणराव पाटील बालक आश्रम बदनापूर, जिल्हा जालना या संस्थेने सादर केलेल्या संपूर्ण प्रस्तावाची नक्कल, कार्यालयीन टिपणी शिफारसपत्रासह अशी माहिती मागितली आहे. सदरचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. सदरची माहिती संकलीत करुन ९२ पृष्ठे विहित मुदतीत तयार करुन ठेवण्यात आली होती व अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. दिनांक २२-०३-२०१० रोजी अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती घेतली आहे. अपिलार्थी यांनी त्याबाबत दिलेली पोच त्यांच्या दप्तर दाखल आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांनी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. अपिलार्थी यांचा लेखी युक्तिवाद विचारात घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०६-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, शासकीय जन माहिती अधिकारी तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिली असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी मोघमपणे नमूद केले आहे की, त्यांना अपूर्ण, दिशाभूल करणारी चुकीची माहिती दिली आहे नेमके नमूद केलेले नाही. या सर्व बाबी तसेच जी माहिती उपलब्ध आहे ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबुराव विठ्ठलराव साळूंके, रा. गणपती गल्ली, जुना जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे-०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शिवाजी भानुदास म्हस्के,<br>रा. इंदिरा नगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग कार्यालय, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शिवाजी भानुदास म्हस्के | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग कार्यालय, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना - श्री. संजय व्यंकटराव पडलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - श्री. सूर्यकांत श्रीमंत धनशेटी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. १९-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०१-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये मौजे पांगरखेड, तालुका अंबड येथील पाझर तलाव क्रमांक ६ व २ तसेच पा. क्र. १० या रोहयो कामावरील मजुरांच्या हजेरीपत्रकाच्या छायांकीत प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा कालावधी सन २००७ ते २००८ असा आहे.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार अपिलार्थीस दिनांक १५-०२-२०१० रोजी माहितीच्या छायांकीत प्रतिकरिता रुपये ९५० इतके शुल्क आवश्यक असल्याचे व निधी प्राप्त होताच माहिती देण्यात येईल असे कळविले आहे. त्यांनी युक्तिवादात पुढे असेही कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे अभिलेखे अपिलार्थी यांना दाखविण्यात आले आहेत. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली. तथापि अपिलार्थी यांना छायांकीत प्रतीची आवश्यकता आहे. यास्तव त्यांनी आयोगाने सूचित केल्यानुसार माहितीची व्याप्ती कमी केली व पांगरखेड पाझर तलाव क्रमांक ६ च्या हजेरीपत्रकाच्या प्रती देण्यात याव्यात अशी विनंती केली. यास्तव जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग कार्यालय, अंबड, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीस पांगरखेड पाझर तलाव क्रमांक ६ च्या सन २००७ ते २००८ या कालावधीच्या हजेरीपत्रकाच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग कार्यालय, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक	११-०४-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी भानुदास म्हस्के, रा. इंदिरा नगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग कार्यालय, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गंगाबिसन गणेशलाल मणियार, | : | अपिलार्थी |
| | मु. पो. परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | मुख्य वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, सातोना खुर्द, तालुका परतूर, जिल्हा जालना | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गंगाबिसन गणेशलाल मणियार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | मुख्य वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, सातोना खुर्द, तालुका परतूर, जिल्हा जालना | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्यापही मिळालेली नाही. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले असता त्यावरही सुनावणी झालेली नाही. अपिलार्थी यांनी दिनांक २१-०४-२०१० रोजीचे प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (7) व19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये आयोग जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. याकरिता प्रकरण माहिती अर्ज व प्रथम अपिलाच्या प्रतीसह त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गंगाबिसन गणेशलाल मणियार, मु. पो. परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२.	जन माहिती अधिकारी तथा मुख्य वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, सातोना खुर्द, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.  (सोबत जोडपत्र अ व ब)

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शरद रामभाऊ लहाने,<br>रा. माहोरा, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्रकल्प संचालक, जलस्वराज्य प्रकल्प, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शरद रामभाऊ लहाने | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. ओ. द. बोडखे,<br>उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,<br>जिल्हा परिषद, जालना | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>जालना - श्री. पी. आर. सवडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४-०६-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०४-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आली आहे. फक्त फोटोच्या प्रती देणे बाकी होते. त्यांनी त्या सोबत आणल्या आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात ही बाब मान्य केली. त्यांना माहिती मिळाली आहे तथापि फोटोच्या प्रती मिळाल्या नव्हत्या. आयोगाने सूचित केल्यानुसार अपिलार्थीस या फोटोच्या प्रती देण्यात आल्या. अपिलार्थीने त्या स्विकारल्या.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शरद रामभाऊ लहाने, रा. माहोरा, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नंदकुमार आसाराम उढाण, : अपिलार्थी
मु. खडकेश्वर, पो. ताडहादगांव, तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,
जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,
जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७७६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नंदकुमार आसाराम उढाण | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (बांधकाम), जिल्हा परिषद, उपविभाग, जालना - श्री. एन. व्ही. शाईवाले | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना - श्री. अे. वाय. गुंजाळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७-०४-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सात मुद्दयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दिनांक ०१ जानेवारी २००७ ते २५ मार्च २०१० असा आहे. सदरची माहिती आता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध करुन घेतली आहे. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील नाहीत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीने फार मोठ्या कालावधीची व विविध मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत. म्हणून आयोगाने त्यांना सूचित केले की, माहिती व्याप्ती कमी करावी व सदर माहितीची पाहणी करावी व आवश्यक असलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी, ही बाब अपिलार्थी यांनी मान्य केली.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांनी मूळ माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीची व्याप्ती कमी केल्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था

करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदकुमार आसाराम उढाण, मु. खडकेश्वर, पो. ताडहादगांव, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (बांधकाम), जिल्हा परिषद, उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुनिल भास्करराव मुळे, : अपिलार्थी
मु. राममुर्ती, पो. तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, राममुर्ती,
तालुका जिल्हा जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, राममुर्ती,<br>तालुका जिल्हा जालना - कु. डोंगरे एस. आर. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जालना<br>- श्री. जायभाये एम. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २५-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २९-०१-२०१० च्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत कार्यालय, राममुर्ती, तालुका जिल्हा जालना अंतर्गत सन २००२ ते डिसेंबर २००९ पर्यंत विविध योजनांबाबतची माहिती तसेच निधीचा तपशील, खर्चाची माहिती व किर्द बुकाच्या प्रती मागितल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत दिनांक २५-०१-२०१० रोजी व दिनांक २६-०२-२०१० रोजी माहिती दिलेली आहे. अशा प्रकारे १७० पृष्ठांची माहिती अपिलार्थीस दिलेली आहे व त्यावेळी प्रमाणकाची माहिती नको असे त्यांनी स्पष्ट केले होते. अपिलार्थी यांना सन २००४ ते २००७ या कालावधीच्या किर्दबुकाच्या सत्यप्रती देणे बाकी होते. ही माहिती दिनांक २०-०३-२०१२ रोजी उपलब्ध झाली आहे. सदरची माहिती ग्रामपंचायत कार्यालय तात्पुरते स्थलांतर झाले असल्याने उपलब्ध होत नव्हती. परंतु विशेष प्रयत्न करुन ती प्राप्त करुन घेण्यात आली.

आज रोजी उपलब्ध झालेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, राममुर्ती, तालुका जिल्हा जालना यांनी नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थीस पाठवावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. तसेच ग्रामसेवक, ग्रामपंचायत, राममुर्ती, तालुका जिल्हा जालना कार्यालयाकडे काहीही मदत नसताना मोठ्या प्रमाणावर माहिती संकलीत करुन बहुतांश माहिती विहित मुदतीत अपिलार्थीस दिलेली आहे व काही माहिती शोध घेऊन संकलीत केलेली आहे. अशा प्रकारे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या दृष्टीने सकारात्मक भूमिका घेतली आहे याची नोंद आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल भास्करराव मुळे, मु. राममुर्ती, पो. तालुका जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, राममुर्ती, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख समद शेख अहेमद,<br>जिल्हा अध्यक्ष, भ्रष्टाचार निर्मुलन जन जागृती संघ,<br>महाराष्ट्र तथा तालुका अध्यक्ष बहुजन समाज पार्टी,<br>भोकरदन, ह. मु. सुरंगली, तालुका भोकरदन,<br>जिल्हा जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,<br>तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,<br>तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, प्रशाला, आन्वा,<br>तालुका भोकरदन, जिल्हा जालना - श्री. वाय. पी. दसपुते | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,<br>तालुका भोकरदन, जिल्हा जालना - श्री. एस. एस. काळुसे | : | उपस्थित |
| ३.४ | शिक्षण विस्तार अधिकारी श्री. यु. एन. जैन | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी, भोकरदन उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, प्रशाला, आन्वा, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी अन्वा, तालुका भोकरदन येथील जिल्हा परिषद हायस्कूल मधील विविध मुद्दयावर खालील माहिती मागितली आहे.

१. शाळा अनुदान, शाळा दुरुस्ती अनुदान, एन. पी. जि. ई. एल. अनुदान, शिक्षक अनुदान व शाळा बांधकामासाठी मिळालेले एकूण अनुदान किती.

२. वरील सर्व अनुदानातून झालेला एकूण खर्च (खर्चाच्या पावत्यासहीत माहिती).

३. इयत्ता ५ ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे हजेरी रजिस्टर, दैनीक गोषवारा रजिस्टर, शा. पो. आहार यांच्यावर झालेला एकूण खर्च (खर्चाच्या पावत्यासहीत माहिती).

४. शिक्षण समितीचे प्रोसिडींग रजिस्टर, किर्द रजिस्टर, व्हिजीट रजिस्टर.

५. शाळेतील एकूण कर्मचारी, स्थानिक राहाणारे व अपडाऊन करणा-या शिक्षकांची नावा-सहीत माहिती, अपडाऊन कुठून करतात व स्थानिक राहणा-या शिक्षकांच्या घरमालकाच्या भाडेपावती इत्यादी माहिती १५ दिवसात देण्यात यावी.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा कालावधी सन २००७ ते मार्च २०१० असा आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत आणि ते दारिद्र्यरेषेखालील आहेत. माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने संकलीत करण्यास काही कालावधी लागला. त्यानतंर माहिती संकलीत करुन अपिलार्थीस २५०० पृष्ठांची माहिती दिनांक ३०-०५-२०१० रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्विकारली आहे व त्याची पोच दिली आहे. या सर्व बाबी कागदपत्रावरुन दिसून येत आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाली आहे असे दिसून येत आहे. व्दितीय अपिलामध्ये अपिलार्थी यांनी त्यांना अपूर्ण व खोटी माहिती दिली असे मोघमपणे नमूद केले आहे. नेमके नमूद केलेले नाही. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता ती एका महिन्यात संकलीत करणे शक्य नव्हते. हे कारण आयोगास पुरेसे वाटत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख समद शेख अहेमद, जिल्हा अध्यक्ष, भ्रष्टाचार निर्मुलन जन जागृती संघ, महाराष्ट्र तथा तालुका अध्यक्ष बहुजन समाज पार्टी, भोकरदन, ह. मु. सुरंगली, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, प्रशाला, आन्वा, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शिरिष रोहिदास सरोदे,<br>चांगले नगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालय अधीक्षक, पंचायत समिती, अंबड,<br>तालुका अंबड, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड,<br>तालुका अंबड, जिल्हा जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड,<br>जिल्हा जालना - श्रीमती पी. डी. रणदिवे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड,<br>तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९-०७-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २८-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये अंबड तालुक्यातील संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत दिनांक ३१-०३-२००८ पर्यंत पूर्ण झालेल्या कामाबाबत विविध मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सन २००१ पासून सुरु झालेली आहे व अशी सहा वर्षाची माहिती अपिलार्थीने अपेक्षिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती अपिलार्थीस प्रत्यक्षात दाखविलेली आहे व उर्वरीत माहितीसाठी संबंधित ग्रामसेवकांकडे संपर्क साधण्याचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत दिनांक ०८-०६-२०१० रोजी अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांच्या कार्यालयातील सर्व माहिती दाखविण्यात आली आहे व त्यांचे समाधान झाले आहे अशी त्यांनी पोच दिली आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन या सर्व बाबी दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिरिष रोहिदास सरोदे, चांगले नगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आकात कोंडिराम राजाराम, : अपिलार्थी
मु. पो. सातोना खुर्द, तालुका परतूर, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सातोना खुर्द,
तालुका परतूर, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परतूर,
तालुका परतूर, जिल्हा जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७८० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सातोना खुर्द,<br>तालुका परतूर, जिल्हा जालना<br>- श्री. आंबोरे शिवाजी मारोतराव | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परतूर,<br>तालुका परतूर, जिल्हा जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९-०५-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २६-०४-२०१० च्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत सातोना, तालुका परतूर हद्दीतील व गावठाणातील जागेवर त्रयस्थाच्या बांधकामाबाबत संपूर्ण माहिती मागितली आहे. सदरच्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सातोना खुर्द, तालुका परतूर, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०६-२०१० रोजी व दिनांक ०३-०८-२०१० रोजी माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती मिळाल्याची पोच दिलेली आहे. अपिलार्थीने यांनी मागितलेली माहिती ही अतिक्रमणाबाबतची आहे,त्यामध्ये व्यापक जनहित आहे.अपिलार्थीने मागितलेली माहिती, त्या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती याची पडताळणी करण्यात यावी व आवश्यक असल्यास त्याची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे चौकशी करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आकात कोंडिराम राजाराम, मु. पो. सातोना खुर्द, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सातोना खुर्द, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल रफीक अब्दुल रशिद, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महिला बाल कल्याण आयुक्तालय,
चर्च रोड, पुणे
जन अपिलीय अधिकारी, :
महिला बाल कल्याण आयुक्तालय,चर्च रोड, पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक आयुक्त (बालकल्याण विभाग), महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी श्रीमती आर.जी.पारधे, निरीक्षक (प्र.शा व सं.) | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - सहआयुक्त (बालकल्याण विभाग),महिला व बाल विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे - श्री. व्ही.डी.मराठे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये महिला व बालकल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या कार्यालयामध्ये नोव्हेंबर, २००७ ते जुलै, २००९ पर्यंत बालकाश्रम योजनेअंतर्गत अनुदानासाठीचा प्रस्ताव व वेळोवेळी केलेल्या शिफारशीसंदर्भात विस्तृत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी माहिती व्यक्तिशः घेणार होते. मागितलेल्या माहितीची व्याप्ती जास्त असल्याकारणाने संकलीत करण्यासाठी काही कालावधी लागला. अपिलार्थी यांनी दि. ०७.०१.२०१० रोजी प्रथम अपील सादर केले. यासंदर्भात सुनावणी दि. १०.०३.२०१० रोजी घेण्यात आली. त्यावेळी संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. यासंदर्भातील पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी दाखल आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावरुन असे दिसून येत आहे की, त्यांनी संपूर्ण जिल्हयातील विविध संस्थांनी दोन वर्षांकरिता पाठविलेल्या प्रस्तावाबाबत तसेच त्यावर शिक्षणाधिकारी यांची शिफारस इ.बाबींची माहिती मागितली आहे. अशी विस्तृत माहिती मागितल्याने सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागते व माहिती देण्याकरिता विलंब समुचित ठरतो. अशाप्रकारच्या माहितीसाठी प्राधिकरणाकडील उपलब्ध माहितीची पाहणी देणे योग्य ठरते, याची नोंद जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी घ्यावी.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीचे द्वितीय अपील दि. १०.०२.२०१० रोजीचे आहे. त्यानंतर माहिती मिळाली आहे. वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती दिली आहे ही बाब पाहता अपील निकाली काढण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल रफीक अब्दुल रशीद, रा. भोईपुरा, अमृतेश्वर मंदीरासमोर,जुना जालना-४३१ २०३.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (बालकल्याण विभाग) महिला व बालविकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त (बालकल्याण विभाग),महिला व बालविकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विनायक माणिकराव काळे,<br>रा.परतुर,जि.जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, परतुर, ता.परतुर,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, परतुर,जि.जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - स्वच्छता निरीक्षक,नगर परिषद, परतुर, जि.जालना- श्री. मनोहर हनमंतराव तुंगनवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी,नगर परिषद, परतुर,जि.जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी द्वितीय अपील दाखल केल्यानंतर माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी दि. १०.०४.२०१२ रोजीच्या निवेदनाद्वारे राज्य माहिती आयोगास कळविले आहे की, त्यांनी दि. १६.०२.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती नगर परिषद, परतुर यांच्याकडून प्राप्त झाली आहे. त्यामुळे दि.१९.०७.२०१० रोजी केलेले अपील मागे घेत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विनायक माणिकराव काळे, नगरसेवक, वार्ड क्र.७, न.प.परतूर, ता.परतूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा स्वच्छता निरीक्षक,नगर परिषद, परतुर, ता.परतुर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, परतुर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विश्वनाथ पाटीलबा सपकाळ,<br>रा.जळगाव सपकाळ, ता.भोकरदन, जि.जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, चिखली,<br>जि.बुलढाणा | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, बुलढाणा | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विश्वनाथ पाटीलबा सपकाळ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस निरीक्षक,पोलीस स्टेशन, चिखली,जि.बुलढाणा -श्री. पी.टी.इंगळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, बुलढाणा | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०७.२०१०<br>(फेरसादर,दि.२९.०७.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी एकूण १६ मुद्यांवर त्यांच्या दि. ०३.११.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये विस्तृत अशी माहिती मागितली आहे. बरीचशी माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची मागितली असल्याचे दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) नुसार प्रश्नार्थक, खुलासेवजा माहिती देय होत नाही. ज्या स्वरुपात माहिती आहे, त्या स्वरुपात देणे अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पाठविली आहे, असे सुनावणीच्या वेळी कथन केले. तथापि अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे एक संच उपलब्ध आहे. तो आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांनी तो स्वीकारला.

या बाबी विचारात घेता या टप्प्यावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वनाथ पाटीलबा सपकाळ,रा.जळगाव सपकाळ, ता.भोकरदन, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,पोलीस स्टेशन, चिखली,जि.बुलढाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रमोद बाबुराव साळवे,<br>रा.जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>महाव्यवस्थापक,<br>जिल्हा उद्योग केंद्र, जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>महाव्यवस्थापक,<br>जिल्हा उद्योग केंद्र, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,जालना - श्री. पी.डी. भाले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना- श्री. बी.डी.जंपावाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. २२.०३.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांच्याकडील सन २००० ते २०१० या कालावधीची एकूण ५ मुद्यांद्वारे विस्तृत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत म्हणून त्यांना दि. ०६.०४.२०१० रोजी विहित मुदतीत ₹१२०/- इतक्या शुल्काचा भरणा करावा, म्हणजे माहिती देण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी दि. ३०.०४.२०१० रोजी शुल्काचा भरणा केलेला आहे व दि. १०.०५.२०१० रोजी अपिलार्थीस एकूण ६४ पृष्ठांची माहिती तयार करुन पाठविण्यात आली आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये त्यांना विलंबाने माहिती देण्यात आली आहे, असे नमूद केले आहे. तथापि वरील बाबी पाहता अपिलार्थीस विहित मुदतीत म्हणजे तीस दिवसांमध्ये माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे, असे मोघमपणे नमूद केलेले आहे. नेमके नमूद केले नाही. अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

या बाबी विचारात घेता या टप्प्यावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रमोद बाबुराव साळवे, क्रांतीनगर, मिशन हॉस्पीटलच्या पाठीमागे, सदरबाजार, जालना - ४३१ २०३.

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. इलियासखान पिता अब्दुल मजीदखान,<br>रा.बदनापुर, जि.जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक कुलसचिव,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>परीक्षा नियंत्रक,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक कुलसचिव,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद - श्री. पी.पी.कलावंत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - परीक्षा नियंत्रक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी परीक्षेसंदर्भात त्रयस्थांची माहिती त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेली आहे. अपिलार्थी यांचा माहितीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे दि. १९.०४.२०१० रोजी प्राप्त झाला. त्यासंदर्भात दि. २४.०५.२०१० रोजी प्रतिसाद दिला आहे.जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे अपील निकाली काढले आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावरुन त्यांनी त्रयस्थांच्या परीक्षेसंदर्भातील कागदपत्रांच्या सत्यप्रती मागितल्याचे दिसून येत आहे. संदर्भित माहिती त्रयस्थांशी संबंधित असल्याने त्यांना माहिती देण्यामध्ये कोणतेही व्यापक जनहित नसल्यामुळे अधिनियमातील कलम 8(1)(j) नुसार अपिलार्थीस ही माहिती देय होणार नाही. अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३,४ हे मुद्दे प्रश्नार्थक, खुलासेवजा आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये 'माहिती' ची व्याख्या स्पष्ट करण्यात आली आहे. या व्याख्येनुसार सदर माहिती देय होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. इलियासखान पिता अब्दुल मजीदखान, औरंगाबाद-जालना हायवे, बदनापूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रकांत बापूराव कारके, : अपिलार्थी
रा. अंबड, ता. अंबड, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
विभाग क्र.२, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मंडळ कार्यालय,
जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. चंद्रकांत बापूराव कारके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कार्यकारी अभियंता,महावितरण विभाग -२, जालना - श्री. पी.एन.दांडगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,महावितरण विभाग -२, जालना - श्री. डी.टी.सायनेकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९.०६.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन २००५ ते मार्च, २०१० या कालावधीची जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध विकास कामाची गावनिहाय यादी व कंपनीशी केलेला करार तसेच राबवत असलेल्या योजनेसंबंधी शासकीय परिपत्रकाच्या झेरॉक्स प्रती, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण या विषयी सविस्तर माहिती, उपकार्यकारी अभियंता यांच्या जॉबचार्टच्या झेरॉक्स, अनुसूचित जाती/जमातीच्या विशेष घटक किंवा तसेच इतर सर्व योजनेची तपशीलवार माहिती, आजपावेतो राबविण्यात आलेल्या योजनेची गावनिहाय सविस्तर माहिती, कार्यालयात आलेला घरकूल निधी व कसा खर्च करण्यात आला, किती शिल्लक आहे, याची सविस्तर माहिती मागितली आहे. अपिलार्थीस आजपर्यंत माहिती देण्यात आली नाही. तथापि माहितीच्या झेरॉक्स प्रतींचा एक संच आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणला आहे. आयोगाच्या सूचनेनुसार तो आज रोजी अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांनी तो स्वीकारला. अपिलार्थीस आज रोजी माहिती प्राप्त झालेली आहे.त्यामुळे यामध्ये काही अपूर्ण माहिती आढळल्यास तसे त्यांनी पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे व पुढील पंधरा दिवसांच्या आत उर्वरित माहितीच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

प्रकरणात अपिलार्थीस माहिती विलंबाने प्राप्त झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महावितरण विभाग -२, जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत बापूराव कारके, रा. अण्णाभाऊ साठे नगर, अंबड, ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महावितरण विभाग -२, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण विभाग -२, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भास्कर माधवराव कुलकर्णी, | : | अपिलार्थी |
| | रा. जालना | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | नायब तहसीलदार (महसूल), | | |
| | तहसील कार्यालय, जालना | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | तहसीलदार, जालना | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भास्कर माधवराव कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, जालना - श्री.एस.आर.वझरकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यामध्ये अपिलार्थी यांना खालील माहिती अभिप्रेत आहे.

१) उपविभागीय अधिकारी, जालना यांनी दि. २०.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे श्री. वळवी नायब तहसीलदार,जालना यांनी दि. २४.०५.२००५ रोजी दिलेला निकाल रद्द करुन प्रकरण फेरचौकशीसाठी तहसीलदार, जालना यांना आदेश दिला होता. त्यावर केलेल्या कार्यवाहीच्या सत्यप्रती (कार्यालयीन टिपणी व रोजनामा)

२) उपजिल्हाधिकारी, भुसूधार, जालना यांनी दि. २५.०४.२००७ रोजी नायब तहसीलदार, जालना यांचे आदेश रद्द केले व फेरचौकशीसाठी दिले, त्यासंदर्भात निर्णय दिला असल्यास त्याची प्रत.

अपिलार्थी यांना माहिती मिळाली नाही. असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय, जालना तसेच जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जालना यांच्याकडे प्रत्येकी ₹२५/- पोस्टेजसह पत्ता असलेले पाकीट अपिलार्थी यांनी पाठविलेले आहे. तथापि प्रतिसाद मिळालेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदरचे लिफाफे परत करावेत अथवा ₹५०/- परत करावेत ही बाब यामुळे न्यायसंगत ठरत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की,त्यांना माहिती मिळालेली नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय सक्षम नाही, असेही त्यांनी कथन केले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती द्यावी व उपलब्ध नसल्यास तसे कळविण्यात यावे व सदर माहिती इतर कोणत्या कार्यालयात उपलब्ध असल्यास त्या कार्यालयाचे नाव कळविण्यात यावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय, जालना यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या प्रती विनामूल्य द्याव्यात व उपलब्ध नसल्यास तसे कळवावे व सदर माहिती इतर कोणत्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकते त्या कार्यालयाचा तपशील कळवावा.

२) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय, जालना यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे त्यांचे लिफाफे परत करावेत अथवा ₹५०/- परत करण्यात यावेत.

३) जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भास्कर माधवराव कुलकर्णी, रेणूका निवास, मंमादेवी नगर,रेल्वे गेटजवळ, नुतन वसाहत, अंबड रोड,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नामदेव हरी नागवे, : अपिलार्थी
रा. वानडगाव, पो. सिंधी काळेगाव,ता.जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७८८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी -श्री. नामदेव हरी नागवे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय,जालना - श्री. नारायण काशिराम पवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | प्रतीवर दिनांक नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०४.०६.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मौ. वानडगाव येथील ग्रामपंचायतची वॉर्डरचनेची कोणत्या पध्दतीने वॉर्डरचना केली, त्या आदेशाची व पंचनाम्याची छायाप्रत व गावात झालेल्या वॉर्डरचनेची व पंचनाम्याच्या छायांकित प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीस दि. २०.०७.२०१० रोजी उपलब्ध माहितीच्या प्रती देण्यात आल्या आहेत. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली. तथापि त्यांना पंचनाम्याची प्रत मिळाली नाही, असे प्रतिपादन केले. पंचनाम्याची प्रत देणे क्रमप्राप्त आहे. या माहितीचा तहसीलदार,जालना यांनी शोध घ्यावा व पंचनाम्याच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय,जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नामदेव हरी नागवे,रा. वानडगाव, पो. सिंधी काळेगाव,ता.जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (निवडणूक),तहसील कार्यालय,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | सौ. प्रयागबाई साहेबराव राऊत, | : | अपिलार्थी |
| | मु. पो.उस्वद, ता. मंठा, जि.जालना | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | तहसीलदार, तहसील कार्यालय, मंठा, | | |
| | जि.जालना | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | तहसीलदार, मंठा, जि.जालना | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - सौ. प्रयागबाई साहेबराव राऊत | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. साहेबराव जानकीराम राऊत | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, मंठा, जि.जालना - श्री.ए.बी. भोईटे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, मंठा, जि.जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने कथन केले की, त्यांनी एकोणीस मुद्यांवर त्यांच्या स्वतःच्या जमिनीबाबत माहिती मागितली आहे. त्यापैकी सहा मुद्यांवरील माहिती त्यांना मिळाली आहे. तथापि उर्वरित माहिती दिली नाही. उर्वरित माहितीचा शोध घेण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कालावधी मागून घेतला. तो मान्य करण्यात येत आहे. त्यानुसार आयोगातर्फे प्रकरणाची पुढील तारीख दि. १५.०६.२०१२ अशी निश्चित करण्यात येत आहे. या सुनावणीस जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मंठा, जि.जालना यांनी कार्यालय प्रमुख या नात्याने उपस्थित राहावे. अधिनियमातील कलम १८(३)(ङ) नुसार तहसीलदार,मंठा,जि.जालना यांची विशेष साक्ष लावण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १५.०६.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. प्रयागबाई साहेबराव राऊत,मु.पो.उस्वद, ता.मंठा, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,मंठा, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मंठा, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी
रा. पिंपळगाव (रेणु), ता. भोकरदन,
जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मंडळ कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय भोकरदन,
जि. जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी,
भोकरदन, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२४०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गजानन संतुकराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी, भोकरदन, जि. जालना - श्री. बाबूसिंग दलसिंग राठोड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जि. जालना - श्री. माधव सुभाषाव बोईनवाड | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - श्री. एम.ए.बाकी | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०९.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १०.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"मौ. हसनाबाद, एक्केफळ, को. पिंपळगाव, लतिफपूर, कोलते टाकळी, सावखेडा, तपोवन, लोणगाव चांदई व फुलेनगर वरील गावात रो.ह.यो.कामे झाली असून प्रत्येकी गावनिहाय अंदाजपत्रकाची मूळ रक्कम, गावनिहाय हजेरी मस्टरची यादी इ. माहिती देण्यात यावी. "

वरील माहितीपैकी जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे, अशी माहिती म्हणजे कामाच्या मापन पुस्तिका तसेच हजेरी मस्टरची माहिती अपिलार्थीस दि. २२.१२.२००९ रोजी देण्यात आली आहे. इतर माहितीच्या प्रती त्यावेळी उपलब्ध होऊ शकल्या नाहीत त्यामुळे अपिलार्थीस देण्यात आल्या नव्हत्या. आता त्या उपलब्ध असून या माहितीचे ५८० पृष्ठे होतात व ते अपिलार्थीस विनामूल्य पाठविण्यात येत आहेत. अपिलार्थी यांनी माहितीकरिता ₹५६६२/- इतक्या रकमेचा भरणा केला आहे, असेही दिसून येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झालेला आहे. प्रथम प्रतिसाद दि. २२.१२.२००९ रोजी दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही करण्यासाठी दक्ष राहावे, असे सूचित करण्यात येत आहे. उपलब्ध माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी व अपिलार्थीस शुल्काची रक्कम परत केली नसेल तर ती परत करण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१) जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,भोकरदन,जि. जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी .

२) जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,भोकरदन,जि. जालना यांनी अपिलार्थीने माहितीपोटी भरलेली रक्कम त्यांना परत केली नसल्यास ती रक्कम आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत परत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख, रा. पिंपळगाव(रेणूकाई), ता. भोकरदन, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,भोकरदन, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवाजी भाऊराव बनकर, : अपिलार्थी
रा. बुटखेडा, पो. अकोला (देव), तालुका जाफ्राबाद,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शिवाजी भाऊराव बनकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना<br>- श्री. व्ही. पी. भारंबे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना<br>- श्री. ए. वाय. गुंजाळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सन २००८ ते २००९ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या विभागातून सर्व जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या कामाचे नाव, काम करणा-या संस्थेचे नांव, पत्ता, दिनांक, कार्यरंभ आदेश, अंदाजपत्रक, आलेला निधी व खर्च वर्षाअखेरसह, कामे अपूर्ण पूर्ण मूळ बिलाच्या एमबीच्या वरील प्रकरणी सर्व छायांकीत प्रतीसह, अशी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा अर्ज विचारात घेता अपिलार्थीने फार मोठ्या कालावधीची व विविध मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत.

याकरिता अपिलार्थी यांनी नेमकी माहिती मागणे आवश्यक आहे जेणेकरुन माहिती अधिकार अधिनियम प्रभावीपणे राबविणे शक्य होईल. आज रोजी ३९३ पृष्ठांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली व अपिलार्थीने ती स्विकारली. यास्तव अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी भाऊराव बनकर, रा. बुटखेडा, पो. अकोला (देव), तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वाजेद खान बालेपीर,<br>अजमेरनगर, भक्ती रोड, बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड<br>- श्री. एस. के. मंदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०८-०१-२०१० च्या माहितीच्या अर्जान्वये सन १९८० ते २००८ या कालावधीतील बीड तालुक्यातील केरोसीन परवानाधारकांची नांवे व संचिका याबाबत विस्तृत अशी माहिती मागितली आहे. त्याचप्रमाणे त्रयस्थ श्री. शेख हमीद शेख अब्दुला यांच्या परवान्याची प्रत मागितली आहे. माहिती जुनी व विस्तृत स्वरुपाची असल्याकारणाने अपिलार्थीने कार्यालयात उपस्थित राहून उपलब्ध अभिलेख्याची पाहणी करावी असे अपिलार्थीस दिनांक ०२-०३-२०१० रोजी कळविले आहे. यावर अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. शेख हमीद शेख अब्दुला यांना उपलब्ध अभिलेख्याची पाहणी केली तथापि त्यांना त्यांचे अभिलेखे दिसून आले नाहीत. याकरिता अपिलार्थी यांना दिनांक १६-०४-२०१० रोजी कळविण्यात आले की, त्यांनी त्यांना अपेक्षित असलेली नस्ती शोधण्याकरिता त्यांच्याकडे काही संदर्भ असल्यास ते देण्यात यावे म्हणजे शोधण्यास मदत होईल. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०६-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वाजेद खान बालेपीर, अजमेरनगर, भक्ती रोड, बीड - ४३१ १२२

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आसाराम ग्यानबा कांदे, : अपिलार्थी
रा. चोपनवाडी, पो. दिंद्रुड, ता. माजलगाव,
जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव,
जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई, जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आसाराम ग्यानबा कांदे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०३.२०१० |

या प्रकरणात यापूर्वी दि.२८.०२.२०१२ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी सध्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्यासाठी आयोगातर्फे पुढील सुनावणी दि. १२.०४.२०१२ अशी निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. मागील सुनावणीच्या वेळी देखील उपस्थित नव्हते.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, त्यांनी माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही. या बाबीची आयोग गंभीर दखल घेत आहे.अपिलार्थी यांच्या मूळ माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांनी मागितलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. यास्तव ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केलेली नाही. याद्वारे अधिनियमातील कलम ७(१)चा भंग झालेला आहे. अधिनियमातील कलम २०(१)नुसार ते शास्तीस पात्र ठरत आहेत. त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा खुलासा त्यांना अधिनियमातील कलम २०(१)च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगास सादर करावा लागेल..

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव, जि.बीड यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१)चा भंग केला असल्यामुळे त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा खुलासा त्यांनी अधिनियमातील कलम २०(१)च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आसाराम ग्यानबा कांदे,रा. चोपनवाडी, पो. दिंद्रुड, ता. माजलगाव,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राम रुस्तुमराव लांडे, | : | अपिलार्थी |
| | रा. होळकर नगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | उप अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जालना | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जालना | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना<br>- श्री. व्ही. पी. भारंबे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना<br>- श्री. ए. वाय. गुंजाळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालील दोन मुद्दयांवर माहिती मागितल्याचे दिसून येत आहे.

१) आपल्या कार्यालयाने केलेल्या (उपविभागनिहाय) एस आर, सीआर कामाची यादी आणि यादीतील कामाचा तपशील तसेच काम करणा-या शाखा अभियंता यांची कामनिहाय यादी.

२) आपल्या विभागात येणा-या सर्व उपविभागाची वार्षिक तपासणी कार्यक्रमाअंतर्गत तपासलेल्या अहवालाच्या छायांकीत प्रती अपेक्षित आहे.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा कालावधी सन २००४ ते २००९ असा आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती व्यापक स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. त्याच-प्रमाणे अपिलार्थी यांनी उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे माहिती अर्जान्वये उपविभागाकडील माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक उपविभागात जन माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत या बाबीची नोंद अपिलार्थी यांनी घेणे आवश्यक आहे. चारपैकी दोन उपविभाग (अंबड व जालना) यांनी अपिलार्थीस माहिती दिली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास कथन केले आहे. उर्वरीत दोन उपविभाग म्हणजे भोकरदन आणि परतूर यांची जन माहिती अधिकारी यांनी संकलीत केलेली माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थीस पाठवावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राम रुस्तुमराव लांडे, रा. होळकर नगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. धोंडिराम अण्णासाहेब देशमुख, (पत्रकार), : अपिलार्थी
रा. दहिगांव, पो. टेंभुर्णी, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद,
तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद,
तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७९१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना<br>- श्री. मोहनराव रामचंद्र बोंडले | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०६-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-०९-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०७-०५-२०१० च्या माहिती अर्जान्वये सन २००७ ते २०१० या कालावधीतील राष्ट्रीय महात्मा गांधी रोजगार हमी योजना, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना, भारत निर्माण योजना, दलित वस्ती सुधार योजना, बारावा वित्त आयोग निधी अशी विस्तृत अशी माहिती मागितली आहे. या माहितीकरिता त्यांनी तक्ता दिलेला आहे त्यात माहिती अपेक्षिली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे त्या स्थितीत देणे अभिप्रेत आहे. माहिती संस्करण करुन देणे अभिप्रेत नाही.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांनी ज्या स्थितीत उपलब्ध आहे त्या स्थितीत दिनांक ३१-०७-२०१० रोजी दिलेली आहे. माहिती विविध कक्षांकडे असल्यामुळे ती संकलीत करण्याकरिता वेळ लागला हे विलंबाकरिता दिलेले कारण पुरेसे आहे असे आयोगाचे मत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. धोंडिराम अण्णासाहेब देशमुख, (पत्रकार), रा. दहिगांव, पो. टेंभुर्णी, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रभु रंगनाथराव बनकर,<br>रा. सातेफळ, पो. अकोलादेव, तालुका जाफ्राबाद,<br>जिल्हा जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>उप कार्यकारी अभियंता, (लपावि), जिल्हा परिषद, जालना<br>- श्री. एम. के. साजधारे, | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, (लपावि), जिल्हा परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ३०-०४-२०१० च्या माहिती अर्जान्वये रो. ह. यो. अंतर्गत जवाहर सिंचन विहिरीसंदर्भात माहिती मागितली आहे. याकरिता अपिलार्थीस दिनांक १२-०५-२०१० रोजी प्रथम प्रतिसाद देण्यात आला व तदनंतर दिनांक १२-०७-२०१० रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहितीबाबत कळविण्यात आले की, तालुका समन्वय समितीने सादर केलेल्या एकास दोन याप्रमाणे लाभार्थीची निवड करण्यात येते. त्याप्रमाणे २०२ व्यक्तींची निवड तालुका स्तरावर झाली आहे. तालुका स्तरावरील शिफारशीमधून जिल्हा समितीकडून १०१ विहिरींची मान्यता अंतीम करण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाली आहे असे दिसून येत आहे. तथापि ती चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे नमूद केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना मिळालेल्या माहितीकरिता काही तक्रार असल्यास त्याबाबत त्यांनी संबंधित प्रशासकीय विभागाकडे दाद मागणे उचित ठरेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रभु रंगनाथराव बनकर, रा. सातेफळ, पो. अकोलादेव, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी, उप कार्यकारी अभियंता, (लपावि), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (लपावि) जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राजीव भगवंता सोनवणे,<br>मु. खंडाळा, पो. गव्हाली, तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, प्रियदर्शनी इंदिरा गांधी कन्या विद्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना<br>- पाठक पी. पी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. बी. एम. कंडलीकर, अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०९-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २७-०९-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे व त्यांना अपिलार्थीस माहिती मिळाल्याची पोच प्राप्त झाली आहे. अपिलार्थी यांनी दिनांक ०९-०४-२०१२ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना पत्र दिलेले आहे व त्यामध्ये त्यांना माहिती मिळाली आहे, असे नमूद केले आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजीव भगवंता सोनवणे, मु. खंडाळा, पो. गव्हाली, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्रियदर्शनी इंदिरा गांधी कन्या विद्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गणेश किसनराव अजगे, | : | अपिलार्थी |
| | रा. कुंभार गल्ली, पाणीवेस, काद्राबाद, जालना | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | अंतर्गत लेखा परिक्षक, नगर परिषद, जालना | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गणेश किसनराव अजगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अंतर्गत लेखा परिक्षक, नगर परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. यास्तव सुनावणीकरिता पुढील तारीख देण्याचा निर्णय आयोगातर्फे घेण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २२-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश किसनराव अजगे, रा. कुंभार गल्ली, पाणीवेस, काद्राबाद, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा अंतर्गत लेखा परिक्षक, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. श्याम श्रीराम शेलगांवकर,<br>व्दारा, ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय, बस स्थानकाजवळ, जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी, नगरपरिषद, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी, नगरपरिषद, जालना<br>- श्री. डी. आर. खिल्लारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक ३१-०५-२०१० रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,

नगर परिषद, जालना यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०६-२०१० रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली असल्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०४-०९-२०१० च्या व्दितीय अपिलामध्ये नमूद केले आहे की, मुद्दा क्रमांक ३ मध्ये नमूद दिनांक २९-०५-२००९ च्या सर्वसाधारण सभेत आयत्यावेळेच्या विषयाप्रमाणे किती ठराव मंजूर झाले याबद्दल माहिती देण्यात आलेली नाही. एकूण २७ ठरावापैकी आयत्या वेळेचे विषय कोणते त्याचा दिलेल्या माहितीवरुन बोध होत नाही. याकरिता बैठकीची विषय सूची अपिलार्थीस देण्यात यावी असे आयोगाचे मत आहे. त्यावरुन अपिलार्थीस ठरावातील आयत्या वेळेच्या विषयाचा बोध होईल. त्याचप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, नगरपरिषद, जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, नगरपरिषद, जालना यांनी मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भात सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्याम श्रीराम शेलगांवकर, व्दारा, ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय, बस स्थानका-जवळ, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, नगरपरिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नरेश बबनराव धारपवळे,<br>दाना बाजार, जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी, नगर परिषद, जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नरेश बबनराव धारपवळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी, नगरपरिषद, जालना<br>- श्री. डी. आर. खिल्लारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये त्रयस्थ श्री. अशोक बोकन यांची एकूण तीन मुद्दयांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी एका मुद्दयाची म्हणजे सर्व्हिस बुकची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. त्रयस्थाची नगरपरिषदेत नेमणूक झाली होती आणि आता ते सेवानिवृत्त झाले आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या नियुक्तीच्या वेळेची कागदपत्रे मागितली आहेत. ही कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध नाहीत म्हणून येता येत नाही असे दिनांक १४-०७-२०१० रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी दुस-या मुद्दयाव्दारे त्रयस्थाच्या वार्षिक संपत्तीचे विवरण मागितले आहे. सदर माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ती देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४-०७-२०१० च्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांनी त्रयस्थाच्या संपत्तीच्या विवरणपत्राची माहिती मागितली आहे. सदरची माहिती उघड करण्यामध्ये व्यापक जनहित काय आहे हे अपिलार्थी सुनावणीच्या वेळी स्पष्ट करु शकले नाहीत. ही माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 8 (1) (j) नुसार देय होणार नाही.

प्रसंगवशात अपिलार्थी यांनी त्रयस्थाची माहिती मागितली आहे. नैसर्गिक न्याय व पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (७) व कलम ११ नुसार त्रयस्थास त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक ठरत होते परंतु तसे केल्याचे आढळून येत नाही. भविष्यात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना याकडे लक्ष पुरवावे लागेल. या सर्व बाबी विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नरेश बबनराव धारपवळे, दाना बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, नगरपरिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अहेमद मुसामियाँ देशमुख, : अपिलार्थी
रा. इंदिरा नगर, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, परतूर, तालुका परतूर,
जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर,
तालुका परतूर, जिल्हा जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७९७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अहेमद मुसामियॉं देशमुख | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, परतूर,<br>तालुका परतूर, जिल्हा जालना - श्री. एम. एच. तुंगनवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर,<br>तालुका परतूर, जिल्हा जालना - श्री. चंद्रकांत पां. सोनवणे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-०९-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये नगर परिषद परतूर येथील विविध कामाबाबत सन २००६ पासूनची एकूण चार विविध मुद्दयांवर माहिती मागितली आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १७-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-०४-२०१२**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अहेमद मुसामियॉं देशमुख, रा. इंदिरा नगर, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामधन भावलाल चांदा, : अपिलार्थी

मु. कल्याणी, पो. सुरंगळी, तालुका भोकरदन,

जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :

तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७९८

२ सुनावणीची तारीख दि. १२-०४-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. रामधन भावलाल चांदा : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी,
भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

- श्री. बाबुसिंग दलसिंग राठोड

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

३.४ जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. सतीश : उपस्थित

विठ्ठलराव पालकर, अनुरेखक, कार्यालय तालुका कृषि
अधिकारी, भोकरदन

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मौजे कल्याणी, तालुका भोकरदन येथील पाणलोट योजने अंतर्गत झालेल्या कामाची सन २००६-२००७, २००८, २००९ व २०१० या कालावधीतील माहिती मागितली आहे. तथापि ही माहिती त्यांना मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती मौजे कल्याणी, तालुका भोकरदन या गावातील आहे व हे गाव आन्वा कृषि मंडळाच्या अंतर्गत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्याकरिता सदर मंडळास दिनांक ०४-०६-२०१०, रोजीच्या पत्राव्दारे कळविण्यात आले होते व त्यानंतर दिनांक २३-०६-२०१०, दिनांक ०६-०९-२०१०, दिनांक २४-०९-२०१० व दिनांक ०७-०४-२०१२ रोजी स्मरणपत्रेही देण्यात आली तथापि त्यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली नाही म्हणून अपिलार्थीस माहिती देता आलेली नाही.

आयोगाने याची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये आयोगातर्फे श्री. एस. आर. सरदार, विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद यांची विशेष साक्ष आयोगापुढे ठेवण्यात येत आहे. यास्तव सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २२-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस श्री. एस. आर. सरदार, विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद यांनी विशेष साक्षीसाठी उपस्थित राहावे. तसेच अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामधन भावलाल चांदा, मु. कल्याणी, पो. सुरंगळी, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. एस. आर. सरदार, विभागीय कृषि सह संचालक, क्रांती चौक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संजय मुरलीधरराव व्यास,<br>रा.जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, पुणे. | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधिक्षक, बिनतारी संदेश मुख्यालय,पुणे-०८ | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजय मुरलीधरराव व्यास | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गृह पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश, पुणे- एस.टी.हांडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, मुख्यालय पुणे- श्री. आय.डी.कांबळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०९.२०१० (पुणे खंडपीठास प्राप्त)<br>१३.०९.२०१० (औ.बाद खंडपीठास प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये पोलीस उपनिरीक्षक बि.स.(अभि) या पदाच्या ज्येष्ठता सूची व पदोन्नतीसंदर्भात शासन निर्णय,परिपत्रक, आदेश व कार्यालयीन टिपणी इ.बाबत एकूण १४ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे.

सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या दि. २२.०६.२०१० रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली आहे. तथापि त्यांना मुद्दा क्र. ३,८,९,१०,११,१२, व १३ या मुद्यांची माहिती प्राप्त झाली नाही, असे त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये कथन केले. जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात कथन केले की, त्यांच्या कार्यालयामध्ये जी माहिती उपलब्ध आहे, ती माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जी माहिती उपलब्ध आहे, ती माहिती ज्या स्वरुपात आहे, त्या स्वरुपात द्यावयाची आहे, संकलीत करुन देय होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी वर नमूद केलेले अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,८,९,१०,११,१२, व १३ या मुद्यांशी संबंधित माहितीकरिता अभिलेखांची पुन्हा छाननी करण्यात यावी व कागदपत्रे उपलब्ध झाल्यास विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे देण्यात यावीत. उपलब्ध न झाल्यास तसे कळविण्यात यावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा गृह पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश, मुख्यालय, पुणे यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय मुरलीधराव व्यास, पोलीस उपनिरीक्षक, वि.स.द्वारा समादेशक,रा.रा.पो.बल गट ३, जालना

२. जन माहिती अधिकारी तथा गृह पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश, मुख्यालय, पुणे -८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, मुख्यालय पुणे-८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुनिल नामदेव गायकवाड, : अपिलार्थी
रा.देवडी हादगाव, पो.ता.घनसावंगी,जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,घनसावंगी, ता.घनसावंगी, जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, घनसावंगी,
ता. घनसावंगी, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुनिल नामदेव गायकवाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल-२),तहसील कार्यालय, घनसावंगी, ता. घनसावंगी, जि.जालना-श्री. ए.जी.मेढे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, घनसावंगी, ता. घनसावंगी, जि.जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी सन २००७ ते २०१० या कालावधीशी संबंधित स्वस्त धान्य दुकानांशी व सार्वजनिक वितरण व्यवस्थेशी संबंधित विस्तृत अशी माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. आयोगाने सूचित केल्यानुसार अपिलार्थी यांनी स्वेच्छेने मागितलेल्या माहितीची व्याप्ती कमी करुन त्यांना खालील माहिती आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

१) सन २००७ ते २०१० या कालावधीत तहसील कार्यालयास प्राप्त झालेल्या शिधापत्रिकांची संख्या.

२) सन १९९२ ते १९९७ या कालावधीमध्ये मयत झालेल्या कार्डधारकांची संख्या व त्यांच्याकरिता जमा झालेल्या धान्याची माहिती.

३) आरगडे गव्हाण ता. घनसावंगी येथील स्वस्तधान्य दुकानाच्या झालेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत.

४) घनसावंगी तालुक्यात सन २००८-०९ या वर्षी नियमानुसार व नियमबाहय उचल केलेल्या मालासहित दुकानासहित माहिती व संबंधित अधिकारी व दुकान यांच्यावर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची छायांकित प्रत

५) सन २००७ ते २०१० या कालावधीत तहसील कार्यालय,घनसावंगीमार्फत ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र दिलेल्या नागरिकांची यादी.

वरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी वरील पाच मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२),तहसील कार्यालय, घनसावंगी, जि.जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल नामदेव गायकवाड,रा.देवडी हादगाव, पो.ता.घनसावंगी,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार( महसूल-२), तहसील कार्यालय, घनसावंगी, ता. घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिनकर किशनराव मुंडकर, : अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय,पालम,
जि.परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय दंडाधिकारी, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दिनकर किशनराव मुंडकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, पालम, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. सी.के.सोनवणे, नायब तहसीलदार (निवडणूक) व श्री. पी.जी.पोटफोडे, अव्वल कारकून, तहसील कार्यालय,पालम,जि.परभणी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी,परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पालम,जि.परभणी यांनी प्रतिनिधीमार्फत प्रकरणात पुढील तारीख देण्याची विनंती केली आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या दि. २५.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी, परभणी यांना निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि. २५.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिनकर किशनराव मुंडकर, शिवनगर, प्लॉट नं. २, दत्तमंदिराजवळ, जुना जालना, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद युसुफोद्दीन स.बाहोद्दीन, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय,
बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय,बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद युसुफोद्दीन स.बाहोद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना मिळाली नाही. त्यांना बीड येथील स.नं. १५५ चे मोजणी रजिस्टर क्र.सि.टी.एस. ६७

प.भू.बीड सोबतच्या पंचनाम्याची नक्कल प्रत आवश्यक आहे.सदरची माहिती त्यांना अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही.

या बाबी पाहता, आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख दि.१९.०६.२०१२ अशी निश्चित करण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती अधिनियमातील कलम 19(8)(a) नुसार अनिवार्य करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १९.०६.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्य्द युसूफोद्दीन स.बाहोद्दीन, रा. प्राथमिक मिल्लीया स्कूल समोर, भादलपुरा, बीड-४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद चांद सय्यद फरिद, : अपिलार्थी
रा. जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
राज्य परिवहन विभाग,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन विभाग, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद चांद सय्यद फरिद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन विभाग,औरंगाबाद- श्री. एस.डी.ओहळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभाग नियंत्रक,राज्य परिवहन विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"सन १९६४ ते १९६६ या कालावधीत औरंगाबाद विभागातून माझा पगार निघत असल्यामुळे कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २९/२००६ नुसार वेतन बिलाची पडताळणी करुन रोजंदारी कालावधीतील सेवा ग्राहय धरण्यात यावी अशी सूचना वरील परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात आले आहे."

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, हजेरीपत्रक व वेतन बिले यासंदर्भातील कागदपत्रे शासन नियमानुसार तीस वर्षापर्यंतच जतन करुन ठेवण्यात येतात. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यापूर्वीची असल्याने या माहितीसंदर्भातील अभिलेखे उपलब्ध होऊ शकत नसल्याने अपिलार्थीस माहिती देता आलेली नाही.याबाबत अपिलार्थीस दि. २७.०१.२०११ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती आता उपलब्ध नसल्याने ती देता आली नसल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद चांद सय्यद फरिद,अकेली बस्ती, सदर बाजार, जालना

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,राज्य परिवहन विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,राज्य परिवहन विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख रसुल महेबुब, : अपिलार्थी
रा. परतुर,ता.परतुर,जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम कार्यालय,परतुर,ता.परतुर,जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक अभियंता श्रेणी-१, सा.बां.उपविभाग, परतूर, जि.जालना - श्री. चव्हाण शेषराव काशीनाथ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एच.जी.कंडाळे, प्रथम लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६.०९.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आली आहे. यासंदर्भातील पोच अपिलार्थी यांनी दिलेली आहे.

आयोगापुढील अपिलार्थी यांच्या दि. १४.०९.२०१० रोजीच्या पत्रावरुन वरील बाब दिसून येत आहे.

या बाबी विचारात घेता या टप्प्यावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख रसुल महेबुब,रा.वॉर्ड १, इंदिरानगर, परतुर,ता.परतुर,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, सा.बां.उपविभाग, परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश सिताराम राजबिंडे, : अपिलार्थी
रा. श्रीधर जवळा, पो.केधळी, ता.परतुर,
जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू,जि.परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
निम्न दुधना प्रकल्प विभाग,
सेलू, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गणेश सिताराम राजबिंडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता,निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू, जि.परभणी - श्री. डी.टी.शिधणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. २९.०५.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मौ. श्रीधरजवळा व वैजोड येथील पुनर्वसन कामाच्या चौकशी अहवालाच्या प्रती मागितल्या अहेत. सदर अहवालाची छायाप्रत अपिलार्थीस दि. ०४.०८.२०१० रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली आहे. अपिलार्थी यांनी आज रोजी त्यांच्या युक्तिवादात त्यांना ही माहिती प्राप्त झाली आहे, ही बाब मान्य केली आहे.

या बाबी विचारात घेता या टप्प्यावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश सिताराम राजबिंडे,रा. श्रीधर जवळा, पो.केधळी, ता.परतुर,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बबनराव दत्तात्रय लोणीकर, : अपिलार्थी
रा. जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
विभाग, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग, जालना- एस.एस.धनशेट्टी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१५.०७.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील साठवण तलाव व लघुतलावाच्या कामासंदर्भात एकूण ३ वर्षांची विस्तृत माहिती मागितली आहे. सर्व माहिती प्रश्नार्थक स्वरुपात मागितली आहे. अशी माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च)नुसार देय होत नाही. तथापि सर्व माहिती संकलीत करुन दि.०४.१०.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पाठविण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली बहुतांश माहिती उपविभागाशी संबंधित मागितली आहे. त्यांच्या कार्यक्षेत्रात एकूण २ जिल्हे व ६ उपविभाग येतात. या सर्व उपविभागांकडून माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार केलेल्या अर्जासंदर्भात सत्वर माहिती मिळण्याच्या दृष्टीने प्रत्येक कार्यालयात जन माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत. अपिलार्थी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती माहितीच्या अर्जाद्वारे मागणे अभिप्रेत आहे. अपिलार्थी यांनी असे केलेले दिसून येत नाही. या बाबीची नोंद अपिलार्थी यांनी घेणे आवश्यक आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती एकत्रित करण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केलेला आहे.

यास्तव प्रकरण या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बबनराव दत्तात्रय लोणीकर, 'स्नेह निवास', अंबड रोड, यशवंतनगर,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मुकेश आर. टोकसिया,<br>रा. जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिक्षक अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना - श्री. एस.एस.धनशेट्टी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधिक्षक अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी शाखा अभियंता श्री. पैठण पगारे यांच्या कार्यकालामध्ये झालेल्या रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००६ ते २०१० असा आहे. जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे, ती अपिलार्थीस दि. २३.०९.२०१० रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली आहे. उर्वरित माहिती उपविभागाकडून आता प्राप्त झाली आहे. ती पाठविण्यात येत आहे. यास्तव उर्वरित माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरित माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुकेश आर. टोकसिया, शीला चौक, सदरबाजार ठाण्याजवळ,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजीव एस.भारती, : अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सामान्य रुग्णालय, जालना
जन अपिलीय अधिकारी, :
सामान्य रुग्णालय,जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजीव एस.भारती | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय,जालना - श्री. आर.एम.मोहिते | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. व्ही.एस.जमधडे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, जालना - डॉ. पी.आर. जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली तथापि त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी माहिती अर्जान्वये दि.१ ऑगस्ट, २००९ रोजी रोजी आर.ए.एन.एम. कोर्ससाठी १८ मुलींकडून अनामत रक्कम प्रत्येकी रु.३०००/- स्वीकारली आहे त्यासंदर्भातील कागदपत्रे मागितली आहेत.

आयोगापुढील युक्तिवादात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या विभागातील कार्यप्रणालीचे विश्लेषण केले व पुढे कथन केले की, प्रत्येक मुलीकडून बॉण्डद्वारे रक्कम किंवा डिपॉझीटचा पर्याय उपलब्ध आहे. या बाबी विचारात घेता यासंदर्भात सुस्पष्ट प्रकिया अपिलार्थीस कळविण्यात यावी, असा निर्णय सुनावणीच्या वेळी सर्वानुमते घेण्यात आला.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय,जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजीव एस.भारती, घर नं. १५, प्रयागनगर, किर्ती हॉटेलच्या पाठीमागे, अंबडरोड, जालना

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रल्हाद सखाराम भलताड, : अपिलार्थी
रा. सावंगी (अवघडराव),
ता.भोकरदन, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,भोकरदन,
ता. भोकरदन, जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय,भोकरदन,जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रल्हाद सखाराम भालताड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही. |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ माहिती अर्जान्वये मौ. सावंगी (अ.राव),ता.भोकरदन येथील गायरान जमिनी स्वयंरोजगारासाठी वादग्रस्त असल्याबाबतचा अहवाल मागितला असल्याचे दिसून येत आहे. तथापि त्यांना ही माहिती प्राप्त झाली नाही, असे दिसून येत आहे. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचेही दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकरदन,जि.जालना यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,भोकरदन, जि.जालना यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रल्हाद सखाराम भालताड, रा. सावंगी अवघडराव,ता.भोकरदन,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,भोकरदन,ता. भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,भोकरदन,जि.जालना यांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती सुर्यवंशी महानंदा बाबासाहेब, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) कार्यालय,
उपविभाग अंबड,जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती सुर्यवंशी महानंदा बाबासाहेब | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप विभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) कार्यालय, उपविभाग अंबड,जि.जालना - श्री. एस.व्ही. पडलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना- श्री. एस.एस.धनशेट्टी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलासोबत जी कागदपत्रे जोडली आहेत, ती सुसंगत नाहीत, त्यामुळे अपिलार्थी यांनी कथन केले की, दि. ०५.०८.२०१० रोजीचा माहितीचा अर्ज जो आयोगापुढे विचाराधीन आहे तो व दि. २०.०४.२०१० रोजीचा दुसरा अर्ज एकसारखाच आहे.त्यामुळे या अर्जाचा सुनावणीमध्ये विचार करण्यास हरकत नाही.

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग अंबड,जि.जालना यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या खर्चाच्या आकडेवारीची कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध होती. ती दि. २३.०४.२०१० रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली आहेत. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही कथन केले की, तत्कालीन शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता यांनी सदरची कागदपत्रे न देता कार्यभार हस्तांतरण केला आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आलेली नाही.

ही बाब पाहता कार्यकारी अभियंता तर्फे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी व अपिलार्थीस कागदपत्रे दाखविण्याची व्यवस्था करण्यात यावी. त्याचप्रमाणे शाखा अभियंता यांनी कागदपत्रे हस्तांतरित न केल्यामुळे, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देता येणे शक्य झाले नाही. याद्वारे अधिनियमातील कलम ७(१)चा भंग झालेला आहे. याकरिता अधिनियमातील कलम २०(१) नुसार संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक शास्तीस पात्र ठरत आहेत. त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा खुलासा त्यांना अधिनियमातील कलम २०(१)च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग जालना यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना यांनी ही कारणे दाखवा नोटीस संबंधितांना तामिल करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

१) जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग अंबड,जि.जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीची पाहणी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत देण्याची व्यवस्था करावी.

२) संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग अंबड,जि.जालना व त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अधिनियमातील कलम ७(१)चा भंग केला असल्यामुळे त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये

याबाबतचा त्यांचा खुलासा त्यांना अधिनियमातील कलम २०(१)च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग जालना यांच्यामार्फत आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती सुर्यवंशी महानंदा बाबासाहेब, एम.आय.डी.सी.एरीया, चंदनझीरा, जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग अंबड,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. देवलाल सुरजीलाल इमले,<br>रा. दुधनवाडी, ता.बदनापूर, जि.जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर,<br>ता. बदनापूर, जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर, ता.बदनापूर, जि.जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. देवलाल सुरजीलाल इमले | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,बदनापूर,जि.जालना - श्री. एस.टी.इंगळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, बदनापूर, जि.जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की,अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीतील ग्रामसभेच्या पाच अहवालांची एकूण १२ पृष्ठे उपलब्ध आहेत. त्याच्या झेरॉक्स प्रती आयोगाच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीस देण्यात आल्या. उर्वरित माहितीचे अहवाल उपलब्ध नसतील तर तसे कळविण्यात यावे. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर,जि.जालना यांनी ही माहिती ते अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत देतील, असे आयोगासमोर प्रतिपादन केले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर, जि.जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरित माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देवलाल सुरजीलाल इमले, रा. दुधनवाडी, ता.बदनापूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,बदनापूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,बदनापूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पापालाल लालचंदजी बोरा, : अपिलार्थी
व्दारा, तुलशी क्लिनिक, स्टेशन रोड, परळी वैजनाथ,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५८

२ सुनावणीची तारीख दि. १३-०४-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. पापालाल लालचंदजी बोरा : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड
- श्री. पी. पी. कुलकर्णी

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. ०५-११-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-१२-२००९

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १९-०१-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०४-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २८-०२-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाली आहे. तथापि त्यांना खालील माहिती मिळाली नाही.

१. तहसील कार्यालयातील वाहनांच्या देखभाल व दुरुस्तीकरिता ०१ जानेवारी २००८ ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत (दिनांक ०५-११-२००९) केलेल्या खर्चाबाबतची माहिती.

सदरची माहिती संकलीत करुन त्याच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) नुसार तहसीलदार, परळी वैजनाथ श्री. झाडके यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी एका महिन्याच्या आत विनामूल्य देयकाच्या छायांकित प्रती देण्याची व्यवस्था करावी.

सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न करुन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली आहे तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब केलेला आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग झाला आहे. याकरिता संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे त्यांना रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत तहसीलदार,तहसील कार्यालय, परळी वैजनाथ यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी तहसीलदार,तहसील कार्यालय, परळी वैजनाथ यांची राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत तहसीलदार,तहसील कार्यालय, परळी वैजनाथ यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पालालालजी लालचंदजी बोरा, व्दारा, तुलशी क्लिनिक, स्टेशन रोड, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत तहसीलदार,तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,जिल्हा बीड)

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अजित एम.देशमुख, : अपिलार्थी
रा. बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, केज,
जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, केज,
जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, नगर पंचायत, केज,जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर पंचायत, केज, जि.बीड - श्री. प्रविण देविदास मानकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.०३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१.०३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०४.२०१० |

प्रकरणात यापूर्वी दि.२९.०२.२०१२ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.) पंचायत समिती केज, जि. बीड उपस्थित होते. त्यावेळी आयोगासमोर कथन करण्यात आले की, केज ग्रामपंचायत कार्यालयाचे आता नगर पंचायत, केज असे रुपांतर झाले आहे. प्रकरणात अपिलार्थी,सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख दि.१३.०४.२०१२ अशी निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. सध्याचे जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी , नगर पंचायत केज, जि. बीड उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत, केज, जि.बीड यांनी आयोगासमोर कथन केले की, केज ग्रामपंचायतीचे रुपांतर आता नगर पंचायत केजमध्ये झाले आहे. यामुळे अपिलार्थी यांनी दि. १२.०४.२०१० रोजी केलेल्या द्वितीय अपिलासंदर्भात तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत त्यांना तपासणी करण्यासाठी काही कालावधी देण्यात यावा. ही बाब विचारात घेता आता ग्रामपंचायत केजचे रुपांतर नगर पंचायत केज असे झाल्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भातील प्रथम अपिलावर तत्कालीन राज्य माहिती आयोगाने दिलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांचे म्हणणे नोंदवून घेऊन नव्याने सुनावणी घेऊन पुन्हा निर्णय घ्यावा व अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.याकरिता मुख्याधिकारी, नगर पंचायत, केज,जि.बीड यांना अधिनियमातील कलम 19(8)(a) नुसार जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत, केज, जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. अजित एम.देशमुख, द्वारा गजानन किराण स्टोअर्स, कारंजा रोड,बीड,ता.जि.बीड-४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, नगर पंचायत, केज,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत, केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजू केशवराव जगताप, | : | अपिलार्थी |
| रा. सुभद्रारत्न, शिवनगर, जालना | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| जिल्हा समादेशक, होमगार्ड अधिकारी, जालना | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| जिल्हा समादेशक, होमगार्ड, जालना | | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८०९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासिक अधिकारी, होमगार्ड, जालना<br>- श्री. डी. बी. मोहिते | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अपर पोलीस अधीक्षक, जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये दिनांक ०१-०१-१९९० ते १६-११-२००९ अशी सुमारे वीस वर्षाच्या विस्तृत कालावधीची जालना जिल्ह्यातील होमगार्ड सर्व्हिसबाबत माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या दिनांक १६-११-२००९ च्या अर्जास जन माहिती अधिकारी तथा प्रशासिक अधिकारी, होमगार्ड, जालना यांनी दिनांक १४-१२-२००९ च्या पत्रान्वये विहित मुदतीत प्रतिसाद देऊन माहितीकरिता रुपये ११४ /- इतके शुल्क प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे भरणा करुन कार्यालयातून माहिती घेऊन जावी असे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. अपिलार्थी यांनी दिनांक १६-०२-२०१० रोजी माहिती घेतल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना खालील माहिती मिळाली नाही असे नमूद केल्याचे दिसून येत आहे.

१. दिनांक ०१-०१-१९९० ते १६-११-२००९ होमगार्ड जालना पथक शहरी व ग्रामीणची यादी.

२. दिनांक ०१-०१-१९९० ते ०१-०१-२००९ पर्यंत कमी करण्यात आलेल्या जालना पथकातील होमगार्डची यादी त्यांचे कमी करण्यात आलेल्या कारणास्तव.

३. दिनांक ०१-०१-१९९० पासून कमी करण्यात आलेल्या होमगार्डला पुन्हा पुनःनियुक्त करण्यात आले त्याची सकारण यादी.

अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली माहिती, त्यांना देण्यात आलेली माहिती व त्यांनी व्दितीय अपिलात नमूद केलेली माहिती, याची संपूर्ण पाहणी करण्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (7) व 19 (8) (a) मधील आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार आयोग अपर पोलीस अधीक्षक, जालना श्री. वसंत परदेशी यांच्यावर जबाबदारी निश्चित करत आहे. त्यांनी याबाबत तपासणी करुन अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती, त्यांना देण्यात आलेली माहिती व माहिती देणे बाकी असल्यास ती जन माहिती अधिकारी देतील याची व्यवस्था करुन प्रकरण निकाली काढण्याच्या कार्यवाही करावी. जी माहिती अभिलेख्यामध्ये उपलब्ध नाही त्याबाबत तसे स्पष्टपणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळवावे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपर पोलीस अधीक्षक, जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०४-२०१२**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजू केशवराव जगताप, रा. सुभद्रारत्न, शिवनगर, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासिक अधिकारी, होमगार्ड, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अपर पोलीस अधीक्षक, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बालाजी शेषराव अडियाल, | : | अपिलार्थी |
| | कार्यकारी संपादक, सा. जागरुक रिपोर्टर, | | |
| | कार्यालय, लक्ष्मीनारायणपुरा, मस्तगड, जालना | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | वन परिक्षेत्र अधिकारी प्रा. जालना (उत्तर) | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | वन परिक्षेत्र अधिकारी प्रा. जालना (उत्तर) | | |
| | - श्री. एच. जी. राठोड | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-१२-२००९ फेरसादर दिनांक १०-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०४-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक २५-११-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना यांच्याकडे प्रथम अपील सादर केले आहे. प्रथम अपील विहित मुदतीत सादर केले नसल्यामुळे अपील फेटाळण्यात आले आहे व तसे दिनांक ०८-१२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दुस-या केलेल्या माहिती अर्जान्वये हीच माहिती मागितली आहे व ती त्यांना देण्यात आली आहे. ही बाब विचारात घेता सदरचे प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी शेषराव अडियाल, कार्यकारी संपादक, सा. जागरुक रिपोर्टर, कार्यालय, लक्ष्मीनारायणपुरा, मस्तगड, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी प्रा. जालना (उत्तर) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीकिशन बाबुराव गोल्डे, : अपिलार्थी
प्लॉट नं. ८, शकुंतला नगर, मंठा रोड, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका निरीक्षक, तालुका भूमि अभिलेख कार्यालय, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८११ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीकिशन बाबुराव गोल्डे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, कार्यालय तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०५-२०१० फेरसादर दिनांक २०-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत, याची गंभीर दखल आयोगाने घेतली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालील माहिती मागितली आहे.

१. अपिलार्थी यांची स्वत:ची जमीन मोजणी करुन घेण्यासाठी तसेच सर्वसाधारणपणे, तातडीच्या पध्दतीने आणि अति तातडीच्या पध्दतीने मोजणी करुन घ्यावयाची असल्यास त्याबाबतच्या फीचा तपशील.

२. अपिलार्थी यांनी दिनांक १३-०२-२००९ रोजी मोजणीकरिता फीचा भरणा केला व त्यानतंर मोजणी दिनांक २९-०९-२००९ रोजी त्यांच्या जमिनीची मोजणी करण्यात आली, अपिलार्थी यांनी ज्यावेळी शुल्काचा भरणा केला होता त्यावेळी प्रतिक्षा यादी किती होती त्याबाबतची माहिती.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता त्यांची उपस्थिती पुढील सुनावणीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम **19 (8) (a)** नुसार अनिवार्य करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस त्यांनी उपस्थित राहावे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २१-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीकिशन बाबुराव गोल्डे, प्लॉट नं. ८, शकुंतला नगर, मंठा रोड, जालना.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दशरथ एकनाथ कांबळे, : अपिलार्थी
रा. शास्त्री मोहल्ला, जुना जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कृषि अधीक्षक कार्यालय, जालना
जन अपिलीय अधिकारी, :
कृषि अधीक्षक कार्यालय, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८१२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि उप संचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, कार्यालय, जालना - श्री. जी. बी. काळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना<br>- श्री. संजीव पडवळ | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १८-१०-२०१० च्या माहिती अर्जान्ये सन २०१० ते २०११ या वर्षासाठी जिल्ह्यातील शेतक-यांना ठिबक सिंचन योजने अंतर्गत दिलेल्या फायद्याबाबत तसेच D. P. U. C. निधीबाबत व यासंदर्भात केलेल्या व्यवहाराच्या सत्यप्रती अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती दिनांक ०५-०१-२०११ रोजी व्यक्तिश: व विनामूल्य देण्यात आली आहे आणि याबाबतची पोच त्यांच्या दप्तारी दाखल आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दशरथ एकनाथ कांबळे, रा. शास्त्री मोहल्ला, जुना जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि उप संचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नाडे ज्ञानेश्वर दगडुजी, : अपिलार्थी
रा. संभाजीनगर, प्रियदर्शनी कॉलनी, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
बांधकाम उपविभाग क्रमांक १, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम
विभाग, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण<br>बांधकाम उपविभाग क्रमांक १, जालना<br>- श्री. विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम<br>विभाग, जालना - श्री. आर. जी. कानडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०८-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १७-०६-२०१० च्या माहिती अर्जान्वये उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम उपविभाग क्रमांक १, जालना यांच्याकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम उपविभाग क्रमांक १, जालना मार्फत जालना शहर व इतर भागात पाणीपुरवठा केला जातो यासंदर्भात विविध चार मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितलेली आहे. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०७-२०१० च्या पत्रान्वये त्यांच्याकडे उपलब्ध असलेली मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, जालना यांच्याकडे सादर केली व मुद्दा क्रमांक १ व ४ ची माहिती विभागीय स्तरावरील असल्याने सर्व मुद्दयांची माहिती त्यांच्या स्तरावरुन देण्यात यावी, असे कळविले आहे. त्यानंतर अपिलार्थीने दिनांक ०९-०८-२०१० रोजी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, जालना यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर माहिती संकलीत करण्यास कालावधी लागेल व दिनांक २८-०९-२०१० पर्यंत माहिती संकलीत होऊ शकेल असे अपिलार्थीस दिनांक ०९-०९-२०१० रोजी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, जालना यांनी कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०९-२०१० रोजी शुल्काचा भरणा करावा असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम उपविभाग क्रमांक १, जालना यांच्याकडे केलेला आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील माहिती अपिलार्थीस देणे अभिप्रेत आहे, जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही त्याबाबत स्पष्टपणे अपिलार्थीस कळविणे आवश्यक आहे व माहिती कोठे उपलब्ध होऊ शकेल त्याचा तपशील देणे आवश्यक आहे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) नुसार माहितीचा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर्ग करणे आवश्यक आहे. या बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, जालना यांच्याशी केलेला पत्रव्यवहार योग्य ठरत नाही. याकरिता भविष्यात त्यांना दक्ष राहावे लागेल. जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी या दोघांनी माहिती देण्याचा केलेला प्रयत्न व अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम

७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नाडे ज्ञानेश्वर दगडुजी, रा. संभाजीनगर, प्रियदर्शनी कॉलनी, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम उपविभाग क्रमांक १, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे,<br>ट्रेड युनियन सेंटर, लक्कडकोट, जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, राहुवाडी, पो. चिंचखेड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, राहुवाडी, पो. चिंचखेड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. सी. ओ. बरडे, कक्ष अधिकारी, पंचायत समिती, अंबड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०१-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पाणीपुरवठा कर्मचारी जे ग्रामपंचायतीमधील कर्मचारी आहेत त्यांच्याबाबत माहिती मागितली आहे. अद्यापपावेतो त्यांना ही माहिती मिळालेली नाही. याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (7) व19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये आयोग गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती,त्यांना देण्यात आलेली माहिती व माहिती दिली नसल्यास का दिली नाही त्याची कारणे या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे, ट्रेड युनियन सेंटर, लक्कडकोट, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, राहुवाडी, पो. चिंचखेड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ज्ञानेश्वर साहेबराव फलके, : अपिलार्थी
रा. तपोवन गोंधन, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तपोवन गोंधन,
तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जाफ्राबाद,
तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ज्ञानेश्वर साहेबराव फलके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तपोवन गोंधन,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जाफ्राबाद,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना - श्री. जी. एस. सुरडकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०८-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांना चार मुद्दयांची ०१ एप्रिल २००५ ते मार्च २००९ या कालावधीची माहिती देण्यात आलेली आहे व अपिलार्थी यांची पोच त्यांच्या दप्तरी दाखल आहे. ०१ एप्रिल २००९ ते मार्च २०१० या कालावधीची माहिती द्यावयाची बाकी आहे. याबाबतची नोंद अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ३०-०८-२०१० रोजी घेतलेल्या सुनावणीत घेतली आहे. अपिलार्थी प्रथम अपील सुनावणीस उपस्थित होते. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत. अत: अपिलार्थीस ०१ एप्रिल २००९ ते मार्च २०१० या कालावधीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पाठवावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तपोवन गोंधन, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे ०१ एप्रिल २००९ ते मार्च २०१० या कालावधीची माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानेश्वर साहेबराव फलके, रा. तपोवन गोंधन, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तपोवन गोंधन, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जनार्धन भागाजी सोळुंके, : अपिलार्थी
रा. लक्ष्मीमाता नगर, वॉर्ड क्रमांक १६, नवे भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, एकेफळ, पो. तळेगांव,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८१६
२ सुनावणीची तारीख दि. १३-०४-२०१२
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी - श्री. जनार्धन भागाजी सोळुंके : उपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, एकेफळ, पो. तळेगांव,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २८-०५-२०१०
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --
६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. २०-०७-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत, याची गंभीर दखल घेण्यात येत आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २०-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (7) व19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये आयोग गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जनार्धन भागाजी सोळुंके, रा. लक्ष्मीमाता नगर, वॉर्ड क्रमांक १६, नवे भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, एकेफळ, पो. तळेगांव, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एकनाथ रामराव गोरे, : अपिलार्थी
रा. माळेगांव, पो. गोलटगांव, तालुका बदनापूर,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी, संलग्न कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, संलग्न कृषि विकास अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, जालना<br>- श्री. आनंद व्यंकटराव गंजेवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्याकडे प्राप्त झालेले नाही. त्यामुळे प्रथम अपिलावर सुनावणी झालेली नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे माहिती अर्ज व प्रथम अपिलाच्या प्रतीसह परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एकनाथ रामराव गोरे, रा. माळेगांव, पो. गोलटगांव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, संलग्न कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (माहिती अर्ज व प्रथम अपिलाच्या प्रतीसह)

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख इम्रान शेख जिलानी, : अपिलार्थी
अत्तार गल्ली, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अध्यक्ष, अलफलाह एज्युकेशनल ॲन्ड वेलफेयर
सोसायटी, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक धर्मादाय आयुक्त, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख इम्रान शेख जिलानी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष, अलफलाह एज्युकेशनल ॲन्ड वेलफेयर<br>सोसायटी, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-११-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १५-०७-२०१० च्या माहिती अर्जान्वये अलफलाह एज्युकेशनल ॲन्ड वेलफेयर सोसायटी, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना या संस्थेबाबतची शाळा व त्या अंतर्गतची माहिती संस्थेकडील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. संस्थेला माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही असे आयोगाने तसेच मा. उच्च न्यायालयाने निर्णय दिलेले आहेत. अपिलार्थी यांना संस्थेची माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी किंवा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकेल. त्याचप्रमाणे संबंधित शाळेस अनुदान उपलब्ध होत असल्यास मुख्याध्यापक यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकेल. अतः अपिलार्थी यांनी येणेप्रकारे अर्ज करणे योग्य ठरते ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मान्य केली. यास्तव सदरचे प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख इम्रान शेख जिलानी, अत्तार गल्ली, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, अलफलाह एज्युकेशनल ॲन्ड वेलफेयर सोसायटी, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक जयवंतराव गुळवे, : अपिलार्थी
रा. बोरखेडी चिंच,
ता.जाफ्राबाद, पो. हिवराकाबली, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
उपविभाग (महसूल), जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अशोक जयवंतराव गुळवे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -अव्वल कारकून,उपविभागीय अधिकारी कार्यालय,जालना -श्री. व्ही.एल.दळवी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी (महसूल),जालना - श्री. एस.एस.गायकवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या जमीन प्रकरणासंदर्भात सुमारे २० वर्षांपूर्वीची माहिती मागितली आहे. संदर्भित माहितीच्या नस्ती उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांना आतापर्यंत माहिती देता आली नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जालना यांनी कार्यालय प्रमुख या नात्याने अभिलेखांची छाननी व पाहणी करुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे. आज रोजी आयोगापुढे सुनावणीच्या वेळी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली नवाजी यशवंतराव गुळवे व इतर १३ यांच्या दि. १०.१०.१९९० रोजीचा अपीलमेमो व त्यासंदर्भात दि. ३१.१०.१९९२ रोजी दिलेला निर्णय अशी एकूण ५ पृष्ठे अपिलार्थीस आयोगाच्या सूचनेनुसार देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.त्यांना हीच माहिती आवश्यक आहे, असे त्यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. अपिलार्थीस आज रोजी देण्यात आलेल्या माहितीची कागदपत्रे साक्षांकित प्रमाणित प्रतीच्या स्वरुपात नाहीत. तथापि अपिलार्थीस ही माहिती साक्षांकित प्रमाणित प्रतींच्या स्वरुपात आवश्यक असल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून ती प्राप्त करुन घ्यावीत व जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती प्रमाणित प्रतींच्या स्वरुपात विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक जयवंतराव गुळवे,रा. बोरखेडी चिंच,ता.जाफ्राबाद, पो. हिवराकाबली, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,उपविभागीय अधिकारी कार्यालय,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक उत्तमराव तौर, : अपिलार्थी
रा. अंकुशनगर, ता.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,घनसावंगी,
जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय,घनसावंगी,जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय,घनसावंगी,जि.जालना -श्री. एल.डी.सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय,घनसावंगी,जि.जालना- श्री.संतोष गोरड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ३१.०७.२०१० रोजी मागितलेल्या माहितीचे अभिलेखे उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देता आली नाही, असे दिसून येत आहे व आता जी माहिती उपलब्ध आहे, ती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे दि. १०.१०.२०११ रोजी अपिलार्थीस काही माहिती कळविण्यात आली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस या माहितीची साक्षांकित स्वरुपातील एक प्रत पुन्हा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

या बाबी विचारात घेता या टप्प्यावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म),तहसील कार्यालय,घनसावंगी, जि.जालना यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे माहितीची साक्षांकित स्वरुपातील एक प्रत आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पुन्हा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक उत्तमराव तौर,समर्थ सहकारी साखर कारखाना लि.अंकुशनगर, ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म),तहसील कार्यालय,घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,घनसावंगी,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

१) श्री. भगवान धारुजी गव्हारे, : अपिलार्थी
२) श्री. कृष्णा सिताराम कारके, रा. परतुर,जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,परतूर, जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,तहसील कार्यालय,
परतूर, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भगवान धारुजी गव्हारे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,परतूर, जि.जालना- श्री.एस.एस.शेट्टी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय, परतूर, जि.जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०९.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व मोठया कालावधीची असल्याकारणाने सर्व संबंधित किरकोळ केरोसिन हॉकर्सतर्फे मागविण्यात आली असून सदर अभिलेखे उपस्थित राहून पाहणी करु शकता, असे दि. २७.१०.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविलेले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीस असेही कळविलेले आहे की, आपण मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्याकरिता रक्कम रु. १३,०००/- आवश्यक असल्यामुळे अनुदानाची मागणी केलेली आहे. अपिलार्थी यांनी अभिलेखांची पाहणी केलेली आहे. तथापि अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांना संपूर्ण माहिती दाखविण्यात आली नाही. मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७(९) नुसार एक दिवस निश्चित करुन पाहणी देणे योग्य ठरत आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.या पाहणीसंदर्भात अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करण्यात यावे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,परतूर, जि.जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भगवान धारुजी गव्हारे व श्रीकृष्ण सिताराम कारके, रा. साठेनगर,परतूर,ता.परतूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,परतुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,परतुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. खरात सुनिल बबनराव,<br>रा. अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, अंबड, जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, अंबड, जि. जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. खरात सुनिल बबनराव | : | उपस्थित |
| ३.२ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, अंबड, ता. अंबड, जि.जालना- श्रीमती रंजना ढोकळे | : | उपस्थित |
| ३.३ | सध्याचे जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, अंबड, ता. अंबड, जि.जालना- श्री. एम.जी.बर्डे | : | उपस्थित |
| ३.३ | सध्याचे जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबड, जि. जालना - श्री. रुपेश सिंगारे | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबड, जि. जालना - श्री. रविंद्र परळीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०१.२००८ (फेरसादर,दि.२७.१२.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, अपिलार्थी यांनी अंबड व घनसावंगी तालुक्यातीत गॅस वितरण गॅस एजन्सीच्या नोंदणी झालेल्या गॅसधारकांची यादी - अशी विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, सदरची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही व ही माहिती हिंदुस्थान पेट्रोलियमच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकते. म्हणून तहसीलदार, अंबड यांनी दि. २८.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन या सर्व बाबी दिसून येत आहेत. तसेच असेही दिसून येत आहे की, हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन यांनी यासंदर्भात तहसीलदार, अंबड यांनाही प्रतिसाद दिला आहे व अपिलार्थीस दि. ०५.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे शुल्क भरण्यात यावे, असेही कळविले आहे.

या बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी या संदर्भात हिंदुस्थान पेट्रोलियमकडून माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल बबनराव खरात,डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर,अंबड, जि.जालना-४३१ २०४

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दामोधर भिकाजी मदन, : अपिलार्थी
रा. केळीगव्हाण, ता. बदनापुर,
जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय, बदनापूर, ता.बदनापूर,जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय, बदनापूर, ता. बदनापूर, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दामोधर भिकाजी मदन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर,जि.जालना - श्री. एस.टी.इंगळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,बदनापूर,जि.जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अर्जदार दामोधर भिकाजी मदन, रा. केळीगव्हाण यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागणी केलेली माहिती या कार्यालयाचे पत्र क्र. २०११/मा/अभिलेख/कावि,दिनांक २०.०४.२०११ अन्वये अर्जदारास पाने १ ते ३३ देण्यात आलेली आहे व अर्जदार यांची पोहोच घेण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी युक्तिवादात म्हटले आहे की, २००० साली जेव्हा विहीरींकरिता अनुदान उपलब्ध झाले तेव्हा फेरफारामध्ये त्यांच्या शेतातील विहिरीची नोंद दुसऱ्याच्या नावे केल्यामुळे ते मोबदल्यापासून वंचित झाले आहेत.

या बाबी विचारात घेता प्रकरणात पुढील तारीख दि. १९.०६.२०१२ अशी निश्चित करण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे तलाठी (श्री. लोखंडे), नायब तहसीलदार व तहसीलदार यांनी संदर्भित फेरफार ज्या कागदपत्रांच्या आधारे झाला त्यासंदर्भातील माहितीशी संबंधित सर्व कागदपत्रांसह व्यक्तिशः उपस्थित राहावे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १९.०६.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, संबंधित तत्कालीन व सध्याचे तलाठी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दामोधर भिकाजी मदन, रा. केळीगव्हाण, ता.बदनापूर,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर,जि.जालना

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,बदनापूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संभाजी रामनाथ पैठणे, : अपिलार्थी
रा. महाकाळा, ता.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी संचालक,
समर्थ सहकारी साखर कारखाना, अंकुशनगर, ता.अंबड, जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी संचालक,
समर्थ सहकारी साखर कारखाना, अंकुशनगर, ता.अंबड, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. राधाकिसन श्रीमंत ढोकळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून सहसंचालक (साखर),औरंगाबाद यांना निश्चित करण्यात येत आहे.त्यांच्याकडे अपिलार्थी यांच्या माहितीच्या मूळ अर्जाची, प्रथम व द्वितीय अपिलाची प्रत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय द्यावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (साखर),औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संभाजी रामनाथ पैठणे, मु.पो. महाकाळा, ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,समर्थ सहकारी साखर कारखाना, अंकुशनगर, ता.अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (साखर),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संतोषकुमार गोकुळचंदजी बाहेती, | : | अपिलार्थी |
| रा. जालना | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| सहायक डायरेक्टर, स्पोर्टस ॲन्ड युथ सर्व्हिसेस विभाग, लातूर | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| सहसंचालक,क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९.०२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०७.२००८ (पुणे खंडपीठाकडे प्राप्त) ३०.१२.२०१० (औ.बाद खंडपीठाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून सहसंचालक क्रिडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०९.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी अपिलार्थीच्या दि. ०९.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोषकुमार गोकुळचंदजी बाहेती, द्वारा विपणन अधिकारी, बेजो शितल सिडस प्रा.लि.बेजो कॉर्नर, मंठा रोड, जालना- ४३१ २०३

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक,क्रीडा व युवक सेवा, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना अपिलार्थीच्या माहितीच्या ,अर्जाच्या प्रथम व द्वितीय अपिलाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.